# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## (मा.प्रशासक यांचा कार्यकाळ दि.३०.०६.२०२१ ते दि.३०.०९.२०२१ पर्यंत)

### मा.प्रशासक, यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठराव क्र.१६७ ते २०३ चे इतिवृत्त

**प्रस्ताव क्रमांक १६७/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०६.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची निवड केंद्र शासनाने स्मार्ट सिटी प्रकल्पाकरीता केलेली असून सदरील निवड शासन निर्णय क्रमांक स्मार्ट सिटी-२०१६/अनौस-५८/प्र.क्र.२६१/नवि-२३ दि.१८.०६.२०१६ नुसार झालेली असून ही योजना पुर्ण करण्यासाठी केंद्र शासन राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था या तीन संस्थेचा हिस्सा निश्चित करण्यात आलेला असून त्याचे वित्तीय आकृतीबंधाचे प्रमाणे हे अनुक्रमे ५०%, २५%, व २५% असे आहे. उक्त शासन निर्णयानुसार स्मार्ट सिटी अंतर्गत प्रकल्पाचा अपेक्षित खर्च रु.१०००.०० कोटी असून यासाठी महानगरपालिकेचा हिस्सा स्वरुपात २५% प्रमाणे र.रु.२५०.०० कोटी औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (ASCDCL) कडे वर्ग करावयाची असून सदरील रक्कम स्मार्ट सिटी व्यवस्थापनाकडे हस्तांतरीत न केल्यास केंद्र शासन उर्वरित प्रकल्प पुर्ण करण्यास वितरीत करणार नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेने सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पात उक्त बाबी करीता रु.५०.०० कोटीची तरतुद केलेली आहे. औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (ASCDCL) मार्फत हाती घेण्यात आलेले प्रकल्प विहीत मुदतीत पुर्ण करणे साठी उक्त अर्थसंकल्पीय तरतुदीस अनुसरून र.रु.६८,५१,५८,१३४.०० (रक्कम रुपये अडुसष्ट कोटी एकावन्न लक्ष अठ्ठावन्न हजार एकशे चौतीस फक्त) औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (ASCDCL) या संस्थेकडे हस्तांतरीत करणे त्याच प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचा उर्वरित हिस्सा औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (ASCDCL) कडे अदा करण्यासाठी हिश्श्याची रक्कम संपेपर्यंतच्या कालावधी करीता मान्यता देण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १६७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासना निर्णयातील तरतुदीनुसार औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (ASCDCL) यांना स्मार्ट सिटी अंतर्गत हाती घ्यावयाचे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीनुसार र.रु.६८,५१,५८,१३४.०० (रक्कम रुपये अडुसष्ट कोटी एकावन्न लक्ष अठ्ठावन्न हजार एकशे चौतीस फक्त) औरंगाबाद महानगरपालिकेचा हिस्सा म्हणुन औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (ASCDCL) कडे वर्ग करणे त्याच प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या हिश्श्याची उर्वरित रक्कम औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (ASCDCL) कडे वर्ग करण्यास हिश्श्याची र.रु.२५०.०० कोटी अदा करण्यास मान्यता देण्यात येते. या पुढे महानगरपालिकेचा हिस्सा अदा करण्यासाठी महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता असणार नाही. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १६८/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०७.०७.२०२१)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.६५, सेव्हनहिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम

विभागाच्या दरसुची सन २०१५-२०१६ नुसार र.रु.२९,८६,२५०/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.०८.०६.२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प सन २०२१-२२ अंतर्गत इतर भांडवली विकास कामे पान क्र.०३ अ.क्र.०३(i) नुसार उपलब्ध तरतुद र.रु.२०५९.४० लक्ष मधुन प्रस्तावित आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.२९,८६,२५०/- इतके मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १६८/२०२१</u>:-**

प्रस्तावात सादर केल्यानुसार, वार्ड क्र.६५, सेव्हनहिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.२९,८६,२५०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १६९/२०२१</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, टी.व्ही.सेंटर, एन-१० येथे सिडको शहर मंजुर विकास योजनेत पी.जी.४ या आरक्षणातील भुखंडावर देय वापराच्या मर्यादित ५० दुकाने/गाळे बांधण्यात आले असून आतील बाजुने स्टेडियम बैठक विकसीत करण्यात आले आहे. यातील ५० गाळ्यांचा त्यावेळी लागु असलेले आरक्षणाचे नियम विचारात घेऊन या गाळ्यांचा जाहीर लिलाव पध्दतीने सोडत काढून ३० वर्षाच्या दिर्घ कालावधीसाठी भाडेपट्टा करारावर सदरचे गाळे प्रदान करण्याचे ठरविण्यात आले होते.

सदरचे गाळे/दुकाने विक्रीसाठी त्यावेळी जी माहिती पुस्तिका छापण्यात आली होती. त्यामध्ये प्रकल्पाची विस्तृत पध्दती, माहिती पुस्तिका विक्री व स्विकृती बाबतची पध्दती, शॉपलेट नोंदणीची पध्दत, शॉपलेट नोंदणीसाठी अटी व शर्तीची माहिती विशद करण्यात आलेली होती. तसेच परिशिष्ट-अ अंतर्गत भाडेपट्ट्याने द्यावयाची सविस्तर माहिती व रु.१००/- च्या मुद्रांकावर परिशिष्ट-ब अंतर्गत सादर करावयाच्या अर्जाचा नमुना सादर करणे, इ.बाबींचा समावेश होता.

पुर्व नियोजनानुसार व मंजुरीनुसार या संकुलातील दुकाने/गाळ्यांची खुली स्पर्धा घडवून स्वारस्य असणाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रकल्पासाठी जाहीर सोडत वर्ष-२०१४ मध्ये काढण्यात आली. त्यासाठी बंद लिफाफ्यात (Sealed Offer) प्राप्त झाल्यानंतर ते लिफाफे उघडण्यात आले व यशस्वी गाळे प्रदान करण्यात आले आहेत. या पुस्तिकेत नमुद प्रमाणे त्या त्या जातीनिहाय, संवर्गनिहाय सर्वोच्च्य बोली धारकांना त्यांची त्यांचे ऑफर अंतर्गत नमुद केलेली रक्कम चार टप्प्यात भरणा करणे बाबत कार्यालयीन पत्राद्वारे त्यांना सुचना देण्यात आली होती.

हे गाळे ज्यांना प्रदान करण्यात आले आहेत, त्यातील एकूण ५० गाळ्यांपैकी २१ गाळेधारक यांनी शॉपलेट नोदणीसाठी माहिती पुस्तिकेतील अ.क्र.३ मध्ये नमुद प्रमाणे देय कालावधीत गाळ्यांची संपुर्ण रक्कमेचा भरणा माहे जुन-२०२१ पर्यंतही केलेला नाही.

तथापि, कोरोना साथरोगाचा संसर्ग नियंत्रणात आणणेसाठी केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी दिशा निर्देश जारी केले आहेत. तसेच आवश्यक त्या कालावधीसाठी लॉकडाऊन (टाळेबंदी) लागू केली होती. या टाळता न येणाऱ्या कालावधीत नागरीकांच्या शहरात खुल्या वापरास दुकाने, खाजगी आस्थापना, कारखाने व उद्योगधंदे बंद होते व काही विशिष्ट वेळेतच/विशिष्ट संख्येच्या टक्केवारीत दळणवळणाची मुभा होती.

त्यामुळे व असे असले तरी सन-२०१४ पासून प्रदिर्घ कालावधी मिळूनही उक्त नमुदप्रमाणे २१ गाळेधारकांनी गाळ्यांची यशस्वी बोली रक्कमेचा संपुर्ण भरणा अद्यापही केला नाही. तथापि, उक्त नमुद

वस्तुस्थिती विचारात घेऊन पालिका प्रशासनाने अशा गाळेधारकांना शेवटची संधी म्हणुन एक महिन्याची मुदतवाढ (दि.२५.०६.२०२१ ते २५.०७.२०२१) प्रदान केली आहे.

सदरचा कालावधी पुर्ण झाल्यानंतरही जे गाळेधारक त्यांच्याकडे शिल्लक गाळ्यांच्या बोली रक्कमेचा भरणा करणार नाहीत. अशा गाळेधारकांचे या पुर्वी प्रदान करण्यात आलेले गाळे रद्द करण्यात येणार आहेत.

यापुर्वी गाळेधारक क्र.३८ व ३९ यांचे गाळे त्यांच्या विनंती वरून त्यांच्या गाळ्यांच्या संचिका सादर करुन विशेष बाब म्हणुन मा.आयुक्त यांनी त्यांच्या विशेष अधिकारात दिलेल्या मंजुरीनुसार माहिती पुस्तिकेतील शॉपलेट नोंदणीसाठी अटी व शर्ती या सदरातील अट क्र.४ शिथील करुन त्यांना भरणा केलेल्या रक्कमेपैकी अनामत रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम संबंधीत गाळेधारक यांना परत करण्यात आली आहे.

या माहिती पुस्तिकेतील शॉपलेट नोंदणीसाठीच्या अटी व शर्ती या सदरा खालील अट क्र.४ नुसार त्यांनी यापुर्वी भरणा केलेली रक्कम यशस्वी निविदा धारकाने महानगरपालिकेस देय रक्कमेबाबत पहिला टप्पा भरल्यानंतर व उर्वरित दुसऱ्या हफ्त्यानुसार ३० दिवसांच्या आत देय रक्कमेचा भरणा न केल्यास निविदाधारकांचे दुकान/गाळा रद्द करण्यात येऊन पहिल्या टप्प्यातील गाळ्यांची भरणा केलेली संपुर्ण रक्कम जप्त करण्यात येईल. असे नमुद आहे.

या विकसीत संकुलात जे ५० गाळे/दुकाने भाडेपट्ट्यावर देण्याचे नियोजन होते. त्यावेळी उक्त २१ गाळेधारकांना शेवटची संधी दिल्यानंतर ही जर गाळ्यांची यशस्वी बोली रक्कमेचा भरणा केला नाही तर सदर गाळ्यांचे/दुकांनाचे त्यांना करण्यात आलेले वाटप कायमपुर्वी रद्द करण्यात येणार आहे.

तथापि, उक्त परिच्छेदात नमुद प्रमाणे कोरोना या संसर्गजन्य साथरोगाच्या पार्श्वभुमीवर व बाजारपेठेत सध्या निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेता, जे गाळेधारकांनी शेवटची संधी मिळूनही संपुर्ण रक्कमेचा भरणा करणार नाहीत त्यांचे बाबतीत माहिती पुस्तिकेतील शॉपलेट नोंदणीसाठी अटी व शर्ती मधील अट क्र.४ मध्ये अंशत: बदल करून पहिल्या हफ्त्यातील भरणा केलेली रक्कम जप्त न करता केवळ त्यांनी भरणा केलेली सुरुवातीची अनामत रक्कम जप्त करणे मानवतेच्या दृष्टिकोनातून व सद्यस्थितीत बाजारपेठेची स्थिती पाहता, अशी सवलत प्रदान करणे योग्य वाटते.

करीता, उक्त नमुद प्रमाणे माहिती पुस्तिकेतील शॉपलेट नोंदणीसाठी अटी व शर्ती या सदरातील अट क्र.४ ही शिथील करुन त्याऐवजी जे गाळेधारक (शेवटची संधी दिल्यानंतरही) संपुर्ण बोली रक्कमेचा भरणा करणात नाहीत. त्यांची पहिल्या हफ्त्याचा किंवा त्यापेक्षा अधिकची रक्कम गाळ्यांची रक्कम भरणा केली असली तरी, अशा गाळेधारकांची भरणा केलेली रक्कम जप्त न करता गाळा रद्द करुन केवळ या गाळ्यांसाठी भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करणे असा बदल करणे त्यानुसार पुढील कार्यालयीन कार्यवाही करणे या गाळ्यांचा ई-लिलाव पध्दतीने नव्याने भाडेपट्ट्यांवर देणे बाबत तसेच यापुर्वी मा.आयुक्त यांनी विशेष बाब म्हणुन गाळा क्र.३८ व ३९ असे एकूण दोन गाळेधारकांच्या विनंती करुन रद्द करून त्यांनी भरणा केलेली अनामत जप्त करून उर्वरित रककम परत केली आहे. या बाबीस कार्योत्तर मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव तसेच या संकुलाच्या तळघरातील खोल्या, हॉल व इतर तसेच या संकुलातील शिल्लक गाळ्यांची ई-लिलाव (e-auction) करुन पुढील तीस वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक १६९/२०२१:-**

प्रस्तावात नमुद प्रमाणे, ज्या गाळेधारकांनी शेवटची संधी म्हणुन देण्यात आलेल्या मुदतवाढीतील कालावधीत बोली नुसार संपुर्ण रक्कमेचा भरणा न केल्यास त्यांना प्रदान करण्यात आलेला गाळा रद्द करणे, त्यांनी भरणा केलेल्या रक्कमेपैकी संवर्गनिहाय लागु असलेली अनामत रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम अशा गाळेधारकांना परत करणे, तसेच यापुर्वी विशेष बाब म्हणुन ज्या गाळेधारक क्र.३८ व ३९ यांना केवळ अनामत रक्कम जप्त करुन त्यांची उर्वरित भरणा केलेली उर्वरित रक्कम परत करण्यात आली आहे. या बाबींसह कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येते. शिवाय या प्रकल्पातील शिल्लक गाळे, तळघरामध्ये निघालेल्या खोल्या, हॉल व इतर स्वारस्य असणाऱ्या व्यक्तिंना/संस्थांना ई-लिलाव (e-auction) पध्दतीने निविदा काढून ३० वर्षाच्या दिर्घ कालावधीसाठी किंवा महानगरपालिकेच्या हितास बाधा येणार नाही. या अनुषंगाने भाडेतत्वावर देणे बाबत करार करणे बाबतचे तसेच या प्रकल्पातील अटी व शर्तीमध्ये काही बदल करावयाचा झाल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७०/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०९.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खामनदी पुर्नजीवन प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प व्यवस्थान सल्लागार (PMC) यांची नेमणुक करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याअंती मान्यतेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला असता, ठराव क्र.१३८/२०२१ दि.२०.०५.२०२१ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. या कामामध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्याकडून विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदापुर्व व निविदा पश्चात कामे करणे, इ.कामांचा समावेश करण्यात आला आहे. प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर या कामासाठी अपेक्षित खर्चाचा अंदाज महानगरपालिकेस येईल. त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे होणारे सेवा शुल्क कळून येणार आहे.

त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण दोन पात्र निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यातील तांत्रिक देकार प्रथम उघडण्यात आल्या नंतर या प्राप्त निविदांचे मुल्यांकन केले असता, QCBS आधारे जे गुण प्राप्त झाले आहेत व निविदेचा वाणिज्य देकार उघडला असता, त्यांनी भरणा केलेले दर खालील नमुद प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | पात्र निविदा धारकाचे नाव | तांत्रिक मुल्यांकना द्वारे प्राप्त गुण | निविदेत भरणा केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | ECO-SATTVA-ENVIROMENTAL SOLUTION Pvt.Ltd. | 96.50 | 1.95% | L-1 |
| 2. | YESH INNOVATIVE SOLUTION LLP | 71.80 | 2.50% | L-2 |

तुलनात्मक दृष्ट्या सर्वाधिक तांत्रिक गुण व सर्वाधिक कमी दर हा ECO-SATTVA-ENVIROMENTAL SOLUTION Pvt.Ltd. यांचा असुन त्याचे निविदा दरास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता, ECO-SATTVA-ENVIROMENTAL SOLUTION Pvt.Ltd. (L-1) यांचा १.९५% इतक्या सेवा शुल्काचा निविदा दराबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १७०/२०२१:-**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे, खामनदी पुर्नजीवन प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता, प्राप्त निविदा दर १.९५% व तांत्रिक मुल्यांकना आधारे ECO-SATTVA-ENVIROMENTAL SOLUTION

Pvt.Ltd.(L-1) यांच्या सेवा शुल्काच्या निविदा प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७१/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०९.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची २.५ एकर शहागंज येथील जागेवरील १७२ धोकादायक दुकाने होती. सदर कार्यवाही नियमाप्रमाणे चालू असतांना एका मुलाचा मृत्यु झाला होता. महानगरपालिकेचे ३ अधिकारी १.श्री.शिवाजी झनझन (उपआयुक्त) २.श्री.सदानंद खन्ना (मालमत्ता अधिकारी), ३.श्री.शेख कादर (इमारत निरिक्षक), ४.श्री.मदगे (जे.सी.बी.चालक) यांच्या विरुध्द सदोष मुनष्यवधाचा गुन्हा सहित भा.दं.वि.चे कलम ३०४(२),२८७,२८८,३२३,४२७ r/w ३४ अन्वये S.C. 11/2015 फौजदारी प्रकरण दाखल झाले होते. या प्रकरणी विधीज्ञ श्री.विलास कदम यांनी बाजु मांडून प्रकरणी सर्वांची निर्दोष मुक्तता केली आहे.

करीता, विधीज्ञ श्री.विलास कदम यांना विशेष फी र.रु.१ लक्ष अदा करण्यास्तव प्रकरण मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**ठराव क्रमांक १७१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, महानगरपालिकेची शहागंज येथील जागेवरील १७२ धोकादायक दुकाने दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणात विधीज्ञ श्री.विलास कदम यांनी विशेष फी ची मागणी केली, त्यानुसार र.रु.१ लक्ष अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२६.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नाविन्यपुर्ण योजनेतुन शासकीय कला महाविद्यालय गेट (मीर आदिल दरवाजा) व त्यालगत किलेअर्क तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन व एका बाजुला खुले व्यासपीठ (Open Stage) करणे बाबत प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला होता. तथापि, यापुर्वी महानगरपालिकेस शहरातील ऐतिहासिक दरवाजांची, तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन केल्याचा अनुभव असल्याने सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी महानगरपालिका यंत्रणेमार्फत प्रस्ताव सादर करणे बाबत निर्देश होते.

त्यानुषंगाने विषयांकीत कामाचा प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), यांच्याकडे निधी प्राप्त होणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता प्राप्त असलेले अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात आले असता, त्यास मान्यता होवुन र.रु.२,२५,६९,७३१/- इतका निधी महानगरपालिकेस वितरीत करण्यात आलेला आहे.

सदरील कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे एस.एस.आर. सन २०२०-२०२१ च्या दरसुचि नुसार तसेच मंजुर Non DSR दरानुसार अंदाजपत्रक र.रु.२,२५,६९,७३१/- चे वास्तुविशारद मे.डी.पी. डिझाइन असोसिएट औरंगाबाद यांच्या मार्फत मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार एकुण प्रकल्प किंमतीच्या ४% दराने सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार करुन घेतले असुन त्यास संबंधित विभागाचे अधिक्षक अभियंता, यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. या प्रस्तावा संदर्भात यापुर्वी मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक-१६३/२०२१ दि.२८.०६.२०२१ नुसार वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना प्रकल्प किंमतीच्या ४% दराने ठराव मंजुर झालेला होता. परंतु शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६, मंत्रालय मुंबई-३२, दि.०४ जुन २०१८ यानुसार वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना अधिकतम शुल्क प्रकल्प किंमतीच्या २% पेक्षा जास्त

अदा करण्यात येऊ नये असे मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद केलेले आहे. त्यानुसार विषय क्रमांक-१६३/२०२१ दि.२८.०६.२०२१ हा पारीत झालेला प्रस्ताव रद्द करण्यात येत असून नवीन सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. करीता, वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना शुल्क २% व GST सह अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच उक्त कामासंदर्भाने आवश्यकते नुसार विविध सक्षम कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात येईल.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.२,२५,६९,७३१/- चा प्रस्ताव वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकुण प्रकल्प किंमतीच्या २% व GST सह दराने शुल्क देणे बाबतच्या सुधारित प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक १७२/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत किलेअर्क येथील मीर आदिल दरवाजा व तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन करणे या कामासाठीचे वास्तुविशारद मे.डी.पी.डिझाईन असोसिएट औरंगाबाद यांच्या मार्फत तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.२,२५,६९,७३१/- च्या प्रस्तावास व वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २% व GST सह दराने शुल्क देणेबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १७३/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२६.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अ.श.व्हीटी पंपासाठी बाऊल असेब्लीचा पुरवठा करण्यासाठी औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवरील सध्याच्या १०० दलली योजनेवर नवीन फारोळा पंपगृह असुन तेथे ६७० अ.श.क्षमतेचे सन १९९१ मध्ये सहा व २००६ मध्ये दोन असे एकुण आठ व्ही.टी.पंप बसविण्यात आलेले असून त्यापैकी पाच पंप सतत २४ तास चालविण्यात येतात व तीन पंप स्टॅण्डबाय ठेवण्यात आलेले आहेत. सदरील पंप ६७० अ.श.व्ही.टी CNE 24x4 Stage, Mather & Platt कंपनी पुणे यांच्या बनावटीचे आहेत. सन १९९१ मधील पंप ३० वर्षापासून तसेच २००६ मधील पंप १४ वर्षापासून कार्यरत असल्याने पंपाच्या बाऊल असेंब्ली मधील Impeller, pump shaft, Impeller Distance Piece, Pump Bearing Bush, Neck Ring, Suction Bell Mouth इ.घर्षणाने खराब होतात. तसेच सी.आय.कास्टींग बनावटीचे केसींग आणि डिफ्युजर सतत पाण्यात असल्याने गंजुन खराब होतात.

औरंगाबाद शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन वाढीव पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यासाठी काम सुरु करण्यात आलेले आहे. सदरील योजना पुर्ण होऊन कार्यान्वीत होण्यासाठी सर्वसाधारण ३ ते ४ वर्षाचा कालावधी लागु शकतो असे इकडील मत आहे. तो पर्यंत शहराचा पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता, सद्यस्थितीतील १०० दलली योजना सुस्थितीत कार्यान्वीत ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी उक्त नमुद पंपाची बाऊल असेंब्ली खराब झाल्यास तात्काळ बदली करुन पंप सुरु करणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत सदरील पंपाचे बाऊल असेंब्ली बाजारात सहज तात्काळ उपलब्ध होत नाही. तसेच सद्यस्थितीत खात्याच्या भांडारात एकही बाऊल असेंब्ली शिल्लक नसल्याने पाणी पुरवठा करण्यास व्यत्यय निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सदर पंपाची बाऊल असेंब्ली खरेदी करून खात्याच्या भांडारात ठेवल्यास भविष्यातील अनुषंगीक पंपाच्या दुरुस्ती करण्यासाठी सोईचे होईल.

उपरोक्त प्रमाणे पंपाच्या बाऊल असेंब्ली खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रु.३५,६९,७०५/-चा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर मान्यता मिळाल्यास ई-टेंडरद्वारे जाहीर निविदा मागवून सदरील पंपाची बाऊल असेंब्ली खरेदी करण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १७३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अ.श.व्ही.टी. पंपासाठी बाऊल असेंब्ली खरेदी करण्यासाठी रु.३५,६९,७०५/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. प्रस्तावित साहित्य खरेदी करण्यासाठी वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२६.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नवीन फारोळा पंपगृह येथील विद्युत उपकेंद्रात कार्यान्वीत असणाऱ्या ६३० के.व्ही.ए.एल.टी. ट्रान्सफॉर्मरवरून नवीन फारोळा पंपगृहातील ३५० अ.श.एल.टी.व्ही.टी. पंप व नवीन फारोळा पंपगृहातील लाईट व इतर तत्सम मशिनरी तसेच १०० दलली जलशुध्दीकरण केंद्रातील लाईट व विविध उपकरणांना विद्युत पुरवठा करण्यात येतो. सदरील एल.टी.ट्रान्सफॉर्मवर वरील कार्यान्वीत असलेला मोठ्या प्रमाणातला विद्युत दाब लक्षात घेता, ३५० अ.श.पंप चालविण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करीता, सदरील ६३० के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मरला समकक्ष असणारा परंतु अतिउच्च विद्युत क्षमतेचा ३३ के.व्ही./४३३ व्होल्ट, १६०० के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर खरेदी करून कार्यान्वीत केल्यास औरंगाबाद ५६ दलली पाणी पुरवठा योजनेवरील ढोरकीन, जुन फारोळा व नक्षत्रवाडी येथे बसविण्यात आलेले ट्रान्सफॉर्मर सदरील खरेदी करावयाच्या ट्रान्सफॉर्मरशी समकक्ष असल्याने आपत्कालीन परिस्थितीत तातडीची उपाययोजना म्हणुन ५६ दलली योजनेवरील पंपगृहात वापरणे सोईचे होईल. करीता नवीन फारोळा पंपगृह येथे ३३ के.व्ही./४३३ व्होल्ट १६०० के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर सेट व तत्सम संबंधीत उपकरणांचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे या कामासाठी ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता सातवी वेळेस फेर निविदेनंतर एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त मे.अलाईड इलेक्ट्रो मेकॅनिकल्स प्रा.लि.पुणे यांची असून त्यांनी भरलेले दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९०% ने जास्ती असे आहेत. कामाची तातडी लक्षात घेता, विशेष बाब म्हणुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९०% ने जास्तीच्या म्हणजेच एकुण र.रु.५२,४२,३२२/- च्या निविदा दरास मान्यता देण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे नवीन फारोळा पंपगृह येथे ३३ के.व्ही./४३३ व्होल्ट, १६०० के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर सेट व तत्सम संबंधीत उपकरणांचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे बाबत मे.अलाईड इलेक्ट्रो मेकॅनिकल्स प्रा.लि.,पुणे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९०% ने जास्तीच्या म्हणजेच एकूण र.रु.५२,४२,३२२/- च्या निविदेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १७४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नवीन फारोळा पंपगृह येथे ३३ के.व्ही./४३३ व्होल्ट, १६०० के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर सेट व तत्सम संबंधीत उपकरणांचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे बाबत मे.अलाईड इलेक्ट्रो मेकॅनिकल्स प्रा.लि.,पुणे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९०% ने जास्तीच्या म्हणजेच एकूण र.रु.५२,४२,३२२/- च्या निविदेस मान्यता देण्यात येते. प्रस्तावित उपकरणांचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे बाबत पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या विकासासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील तांत्रिक स्वरुपाचे नवीन प्रकल्प/कामे सुरु आहेत. महानगरपालिकेतील विविध प्रकल्पांना शासन स्तरावर पाठपुरावा करुन मंजुर करून घेणे आवश्यक आहे. सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून काम करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

महराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकमध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

करीता, श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांना सातारा-देवळाई येथील विविध विकास कामांचे DPR च्या कामासाठी व महानगरपालिकेचे प्रलंबित प्रकल्पांचा मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून मंजुर करून घेणे या विवक्षित कामासाठी सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक १७५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या विकासासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील तांत्रिक स्वरुपाचे नवीन प्रकल्प/कामे सुरु आहेत. महानगरपालिकेतील विविध प्रकल्पांना शासन स्तरावर पाठपुरावा करुन मंजुर करून घेणे आवश्यक आहे. सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून काम करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

महराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकमध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब

कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

करीता, श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांना सातारा-देवळाई येथील विविध विकास कामांचे DPR च्या कामासाठी व महानगरपालिकेचे प्रलंबित प्रकल्पांचा मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून मंजुर करून घेणे या विवक्षित कामासाठी सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भीमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) अंतर्गत पेठेनगर येथील कमल हौसिंग सोसायटी जवळील रस्त्याचे डांबरीकरण करणे (फेस-ए) या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१९-२०२० च्या दरसुचीनुसार र.रु.२७,५९,८४१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २०२०-२१ मधील मंजुर रेखांकनात विविध विकास कामे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.२७,५९,८४१/- चे अंदाजपत्रक मान्यतेचा प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १७६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भीमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) अंतर्गत पेठेनगर येथील कमल हौसिंग सोसायटी जवळील रस्त्याचे डांबरीकरण करणे (फेस-ए) करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.२७,५९,८४१/- च्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०७.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भीमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) अंतर्गत पेठेनगर येथील कमल हौसिंग सोसायटी जवळील रस्त्याचे डांबरीकरण करणे (फेस-बी) या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१९-२०२० च्या दरसुचीनुसार र.रु.३०,३२,०८१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २०२०-२१ मधील मंजुर रेखांकनात विविध विकास कामे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.३०,३२,०८१/- चे अंदाजपत्रक मान्यतेचा प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १७७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भीमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) अंतर्गत पेठेनगर येथील कमल हौसिंग सोसायटी जवळील रस्त्याचे डांबरीकरण करणे (फेस-बी) करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.३०,३२,०८१/- च्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १७८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०५.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाभियान अंतर्गत औरंगाबाद शहर पाणी पुरवठा प्रकल्पाच्या रुपये १६८०.५० कोटी किंमतीच्या पाणी पुरवठा योजनेला नगर विकास विभाग शासन निर्णय क्रं.नगरो-२०१९/प्र.क्र.२५८/नवि-३३ दि.१३.०९.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.प्रशासकीय मान्यतेच्या अटीनुसार सदर प्रकल्पाची कार्यान्वयीन यंत्रणा (Implementing

Agency) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण राहणार असून उक्त काम पुर्ण ठेव तत्वावर करण्यात येणार आहे. या प्रकल्पा अंतर्गत ४९ उंचावरील व ४ जमिनीवरील जलकुंभ बांधण्यात येणार आहेत.

मंजुर योजनेतील स्थापत्य कामांची निविदा प्रक्रिया पुर्ण होवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत नियुक्त कंत्राटदाराकडून वितरण व्यवस्थेतील जलकुंभांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रस्तावीत प्रकल्पा अंतर्गत खालील ठिकाणी नविन जलकुंभ बांधण्यात येणार आहेत.

४. हडको, एन-११, एस.बी.ओ.ए.शाळेच्या पाठीमागे असलेला अर्धवट जलकुंभाच्या जागेत.

५. जिन्सी येथील वापरात नसलेला संप व पंपगृह परिसरात.

६. ज्युब्लीपार्क पंपगृहाच्या परिसरात.

सदरील ठिकाणी जलकुंब बांधण्याकरीता जागा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी असलेले बांधकामे निष्काशीत करुन प्रस्तावीत जलकुंभांकरीता जागा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. अस्तित्वातील बांधकामांची माहिति खालीलप्रमाणे

**१. हडको, एन-११, एस.बी.ओ.ए.शाळेच्या पाठीमागे असलेला अर्धवट जलकुंभ**

सदरील जलकुंभाचे बांधकाम सन २००७-०८ मध्ये सुरु केले होते. सन २००९ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेस UIDSSMT अंतर्गत मान्यता मिळाल्याने व यानंतर हा प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्याचे ठरविल्याने कन्सेशन ॲग्रीमेंटमधील तरतुदीनुसार सदरील जलकुंभाचे बांधकाम पुर्ण करता आले नाही. सदरील जलकुंभाचे नियोजन सन २००६-०७ साली असलेल्या परिस्थितीनुसार करण्यात आहे होते. सदरील जलकुंभाचे अर्धवट बांधकाम उपयोगात घेवून त्याचा समावेश पीपीपी तत्वावरील योजनेत करण्यात आला होता. परंतू सदर योजना पुर्ण झाली नाही. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेल्या रु. १६८०.५० कोटी किंमतीच्या प्रकल्पात पुढील ३० वर्षाचे म्हणजे सन २०५२ चे नियोजन करण्यात आलेले आहे. यामुळे या जलकुंभाचे सन २००६-०७ साली केलेल्या संकल्पनात मोठ्या प्रमाणावर तांत्रिक बदल झाल्याने जलकुंभाचे अर्धवट बांधकाम प्रस्तावीत जलकुंभाकरीता लागू पडत नाही. सदरील ठिकाणी बॉटम स्लॅब पर्यंत कॉलम व ब्रेसचे अर्धवट स्थितीतील बांधकाम झालेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता यांनी दि.०८.०५.२०२१ रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन सदरील बांधकाम निष्काशीत करुन प्रस्तावीत जलकुंभ बांधणे आवश्यक असल्याचे सांगितले. अनुषंगाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी अस्तित्वातील अर्धवट जलकुंभाचे बांधकाम निष्काशील करणे बाबत परवानगी मिळणे संदर्भाने दि.०४.०६.२०२१ रोजी पत्र दिले आहे. सदरील जागा तांत्रिक दृष्ट्या जलकुंभाच्या बांधकामासाठी योग्य असल्याने व परिसरात इतर ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने अर्धवट स्थितीतील बांधकाम निष्काशीत करुन प्रस्तावीत जलकुंभाकरीता जागा उपलब्ध होवू शकते.

**२. जिन्सी येथील वापरात नसलेला संप व पंपगृह**

सदरील ठिकाणी ९० हजान लि. क्षमतेची साठवण टाकी, पंपगृह व पत्र्याचे छत असलेली रुम आहे. सदरील साठवण टाकी व अनुषंगीक बांधकामे अत्यंत जुनी असून सद्यस्थितीत मोडकळीत आल्याने व पर्यायी व्यवस्था झाल्याने वापरात नाही. पंपगृहातील विद्युत व यांत्रिक उपकरणे काढून घेण्यात आलेली आहेत. जिन्सी परिसरात प्रस्तावीत जलकुंभाकरीता नविन जागा उपलब्ध नसल्याने ही बांधकामे निष्काशीत केल्यास प्रस्तावीत जलकुंभाकरीता जागा उपलब्ध होऊ शकते. या संदर्भाने कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबाद यांनी अस्तित्वा

तील बांधकाम निष्काशीत करणे बाबत परवानगी मिळणे संदर्भाने पत्र क्र.४०३/२०२१ दि.०३.०३.२०२१ रोजी पत्र दिले आहे.

**३. ज्युब्लीपार्क पंपगृह येथील स्टोअर रुम व इतर बांधकामे**

ज्युब्लीपार्क पंपगृहाच्या परिसरात जुने स्टोअर रुम व त्या लगत कर्मचाऱ्याकरीता कच्या बांधकामात असलेल्या खोल्या आहेत. या जलकुंभाकरीता इतरत्र पर्यायी जागा नसल्याने सदरील स्टोअर रुम व कच्चे बांधकाम निष्काशीत करुन जागा उपलब्ध करुन देता येईल्. या संदर्भाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी अस्तात्वातील बांधकाम निष्काशीत करणे बाबत परवानगी मिळणे संदर्भाने पत्र क्र. ४०३/२०२१ दि. ०३.०३.२०२१ रोजी पत्र दिले आहे.

औरंगाबाद शहराकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना हा महत्वकांक्षी प्रकल्प असल्याने प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण होण्याकरीता वरील नमुद बांधकामे निष्काशीत करुन प्रस्तावीत जलकुंभाकरीता जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभोसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १७८/२०२१:-</u>**

प्रस्तावीत औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत प्रस्तावीत जलकुंभाच्या कामासाठी ज्युब्लीपार्क येथील स्टोअर रुम व लगतची बांधकामे, जिन्सी येथील वापरात नसलेला संप व अनुषंगीक बांधकामे तसेच एन-११, एस.बी.ओ.ए. शाळेच्या पाठीमागे असलेले जलकुंभाचे अर्धवट बांधकाम निष्काशीत करुन जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मुंजर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १७९/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०६ .०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रिलायन्स मॉल लगत असलेले महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षणातुन मिळालेल्या इमारतीमधील मधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल प्रत्येकी हॉलचे क्षेत्रफळ १५३.०० चौ.मी ऐवढे असून असे एकत्रित ६१२.०० चौ.मी. पार्किगच्या व्यवस्थेसह मिळणेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयासाठी भाडेतत्वावर मागितले असल्याने त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे आकारणी करुन भाडेतत्वावर देणेसाठी संतती दर्शविलेली असल्याने उक्त इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रा नुसार भाडेतत्वार प्रशासकीय ठराव क्र.७१, दि. २१.१२.२०२० अन्वये देण्यात आले होते.

परंतु सदरील कार्यालय तिसऱ्या मजल्यावर असल्याने मौखिक तक्रारी केलेल्या असून सदर कार्यालयात आदिवासी, अपंग व वृध्द येत असल्याने त्यांच्या कार्यालयाचे कार्यक्षेत्र औरंगाबाद, जालना, बीड व लातुर या ०४ जिल्ह्याचे लाभार्थी येत असून सदर इमारतीमध्ये लिफ्ट नसल्याने त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्यांनी पहिल्या मजल्यावरील तीन गाळे हॉल व त्याच्या वरील मजल्यावर असलेला एक हॉल उपलब्ध करून द्यावे किंवा ०४ हॉल उपलब्ध नसतील तर ०३ हॉल उपलब्ध करून आदिवासी लाभार्थ्यांची अडचण दुर करणेसाठी उपलब्ध करून दिल्यास तात्काळ तिसऱ्या मजल्यावरील कार्यालय पहिल्या मजल्यावर स्थलांतरित करण्यात येईल. अशी विनंती केली आहे.

करिता संबंधीत कार्यालयाच्या विनंती नुसार तिसऱ्या मजल्यावरील ०४ हॉलसाठीचा ठराव क्र.७१, दि.२१.१२.२०२१ रोजीचा ठराव रद्द करुन तिसऱ्या मजल्यावरील ०४ हॉल ऐवजी पहिल्या मजल्यावरील ०३ हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे आकारणीस अधीन राहून ०३ हॉलचे एकुण

क्षेत्रफळ ४५०० चौ.फुट आकाराचे हॉल कार्यालयास उपलब्ध करून देणेसाठीचा प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्त तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक १७९/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रिलायन्स मॉल लगत असलेले महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षाणातुन मिळालेल्या इमारतीमधील मधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल प्रत्येकी हॉलचे क्षेत्रफळ १५३.०० चौ.मी ऐवढे असून असे एकत्रित ६१२.०० चौ.मी. पार्किगच्या व्यवस्थेसह मिळणेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयासाठी भाडेतत्वावर मागितले असल्याने त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे आकारणी करुन भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली असल्याने उक्त इमारतीमधील मधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडेतत्वार प्रशासकीय ठराव क्र.७१, दि. २१.१२.२०२० अन्वये देण्यात आले होते.

परंतु सदरील कार्यालय तिसऱ्या मजल्यावर असल्याने मौखिक तक्रारी केलेल्या असून सदर कार्यालयात आदिवासी, अपंग व वृध्द येत असल्याने त्यांच्या कार्यालयाचे कार्यक्षेत्र औरंगाबाद, जालना, बीड व लातुर या ०४ जिल्ह्याचे लाभार्थी येत असून सदर इमारतीमध्ये लिफ्ट नसल्याने त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्यांनी पहिल्या मजल्यावरील तीन गाळे हॉल व त्याच्या वरील मजल्यावर असलेला एक हॉल उपलब्ध करून द्यावे किंवा ०४ हॉल उपलब्ध नसतील तर ०३ हॉल उपलब्ध करून आदिवासी लाभार्थ्यांची अडचण दुर करणेसाठी उपलब्ध करून दिल्यास तात्काळ तिसऱ्या मजल्यावरील कार्यालय पहिल्या मजल्यावर स्थलांतरित करण्यात येईल. अशी विनंती केली आहे.

करिता, संबंधीत कार्यालयाच्या विनंती नुसार तिसऱ्या मजल्यावरील ०४ हॉलसाठीचा ठराव क्र.७१, दि.२१.१२.२०२१ रोजीचा ठराव रद्द करुन तिसऱ्या मजल्यावरील ०४ हॉल ऐवजी पहिल्या मजल्यावरील ०३ हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे आकारणीस अधीन राहून ०३ हॉलचे एकुण क्षेत्रफळ ४५०० चौ.फुट आकाराचे हॉल कार्यालयास उपलब्ध करून देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १८०/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०६.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मागील २ वर्षापासून संपुर्ण जगात कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला असून महाराष्ट्र राज्यात देखील याचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये अनेक जण कोरोना बाधीत झाले असून त्यामध्ये बऱ्याच जणांना आपले प्राण गमवावे लागले व यामुळे शहरातील जनजीवनांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम झालेला दिसुन येतो.

अशा संकटाच्या वेळी औरंगाबाद जिल्ह्यातील प्रशासन २४ तास सक्रीय होते. यामध्ये महानगरपालिका तसेच राज्य शासनाचे रुग्णालय (घाटी) यांनी उत्कृष्ट सेवा देऊन कोरोना विषाणुचा सामना केला. परंतु कोरोना विषाणुंचा वाढता प्रादुर्भाव पाहता शासन यंत्रणा अपुरी पडत असतांना अनेक खाजगी हॉस्पीटल, नर्सिंग होम, क्लिनीक यांनी या कोव्हिड-१९ च्या काळात COVID Care Centre (C.C.C.)Dedicated COVID Health Centre (D.C.H.C. & Dedicated COVID Hospital (D.C.H.) म्हणुन कोव्हिड रुग्णांची सेवा व सुश्रुषा करून अनेकांना कोरोनावर मात करण्याचा सिंहाचा वाटा उचललेला आहे.

कोव्हिड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावाच्या काळात ज्यावेळी वैद्यकीय यंत्रणा अपुरी पडत होती अशा वेळी संकटाला तोंड देण्यासाठी अनेक खाजगी रुग्णालये समोर आली व रुग्णांची सेवा करत स्थिती नियंत्रणात आणण्यास मोलाची कामगिरी केलेली आहे.

अशा मोलाची कामगिरी करणाऱ्या खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक ज्यांनी कोव्हीड काळात COVID Care Centre (C.C.C.)Dedicated COVID Health Centre (D.C.H.C. & Dedicated COVID Hospital (D.C.H.) म्हणुन कार्य केले. त्यांचे बांधकाम परवानगी व भोगवटा प्रस्ताव जे औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयात दाखल असून कार्यवाही अंतर्गत आहे ते प्रस्ताव हाताळतांना सदर रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक यांनी केलेले विना परवाना बांधकाम, इतर अनियमित तसेच परवानगी विना केलेले बांधकाम (देय मर्यादेत) नियमित करून देतांना महराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये दंडाची आकारणी करणे करीताचा धोरणात्मक निर्णय औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत घेण्यात आलेला आहे.

कोव्हिड-१९ ची परिस्थिती पाहता व तिसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेता सदर रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक COVID Care Centre (C.C.C.)Dedicated COVID Health Centre (D.C.H.C. & Dedicated COVID Hospital (D.C.H.) यांच्यावर आर्थिक ताण आला असून भविष्यात देखील त्याची शक्यता नाकारता येत नसल्याने अशा परिस्थितीत मोलाची कामगिरी बजावत असलेल्या रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक ज्यांनी काळात COVID Care Centre (C.C.C.) Dedicated COVID Health Centre (D.C.H.C. & Dedicated COVID Hospital (D.C.H.) म्हणुन कार्य केले त्यांना दंडाची रक्कम आकारणे संयुक्तीक होणार नाही.

वरील परिस्थीती लक्षात घेता, जे रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक हे कोव्हीड काळात COVID Care Centre (C.C.C.)Dedicated COVID Health Centre (D.C.H.C. & Dedicated COVID Hospital (D.C.H.) म्हणुन सक्रिय होते व राहतील अशा रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक यांचे दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंतच्या कालावधीत कार्यवाही अंतर्गत असलेले प्रस्ताव तसेच नव्याने दाखल होणारे बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र प्रस्ताव बाबत निर्णय घेतांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१४३ अन्वये केलेल्या दंडाच्या आकारणीमध्ये १००% सुट देणे योग्य होईल.

करीता, प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक १८०/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जे रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक हे COVID Care Centre (C.C.C.)Dedicated COVID Health Centre (D.C.H.C. & Dedicated COVID Hospital (D.C.H.) म्हणुन कोव्हिड काळात सक्रिय होते व राहतील अशा रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनीक यांचे दि.३१ मार्च २०२२ पर्यंतच्या कालावधीत कार्यवाही अंतर्गत असलेले प्रस्ताव तसेच नव्याने दाखल होणारे बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र प्रस्ताव बाबत निर्णय घेतांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१४३ अन्वये केलेल्या दंडाच्या आकारणीमध्ये १००% सुट देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १८१/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०६.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ च्या कलम-३ मधील पोट क्रमांक (१) मध्ये (क) ०१ जानेवारी, २००१ रोजी या मजकुराऐवजी ३१ डिसेंबर, २०२० रोजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(ख) दुसऱ्या परंतुकातील खंड (क) मध्ये १ जानेवारी, २०११ नंतर या मंजकुराऐवजी ३१ डिसेंबर, २०२० दाखल करण्यात आला आहे. सदर अधिनियम १२ मार्च २०२१ च्या राजपत्रान्वये अंमलात आला आहे.

शासनाने मान्यता दिलेल्या सुधारित अधिनियमाची अंमलबजावणी करणेसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

I. गुंठेवारी विकास नियमितीकरण करण्यासाठी शुल्क आकारणी पुढील प्रमाणे करण्यात येईल.

**उदा.**:-२०X३० च्या भूखंडावरील तळमजल्याच्या बांधकामासाठी आकारणी खालील प्रमाणे,

| **अ.क्र.** | **शुल्क आकारणीचा प्रकार** | **दर (प्रती चौ.मी.)** | **क्षेत्र चौ.मी.** | **रक्कम रु** |
|---|---|---|---|---|
| १. | छाननी शुल्क (बांधकाम क्षेत्रावर) | ४/- | ५५.७६ | २२३/- |
| २. | विकास आकार (भूखंड क्षेत्रावर) | १,१४०/- | ५५.७६ | ६३,५६६/- |
| ३. | प्रशमन शुल्क | | | |
| | अ. जमिन विकास शुल्क<br>(भूखंड क्षेत्रावर वार्षीक मुल्यदर तक्त्यामधील दराच्या ०.५% दराने) किंवा ६०/- प्रती चौ.मी. यापैकी जो दर अधिक असेल तो दर | ६०/- | ५५.७६ | ३,३४६/- |
| | ब. शहर विकास निधी<br>(बांधकाम क्षेत्रावर वार्षीक मुल्यदर तक्त्यामधील दराच्या २% दराने)<br>अंदाजीत दर रु. ७,००० X २% =१४०/- | १४०/- | ५५.७६ | ७,८०७/- |
| | | | एकूण | ७४,९४२/- |

उक्त प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येईल.

ज्या मिळकतीचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा मिळकतींच्या निवासी वापरासाठी वरीलप्रमाणे येणाऱ्या रक्कमेच्या ५०% रक्कम आकारणी करावी. त्यामध्ये वाणिज्य वापर असल्यास वाणिज्य वापरासाठी १००% रक्कम म्हणजेच आकारणीच्या (अनु. ०३-ब) ची पूर्ण रक्कम आकारणी करावी. तसेच ज्या मिळकतीचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. पेक्षा जास्त असेल त्या भूखंड/ मिळकतीसाठी वरील आकारणीतील रक्कम निवासी वापरासाठी १००% म्हणजच पुर्ण रक्कम व त्यामध्ये वाणिज्य क्षेत्राचा समावेश असल्यास वाणिज्य क्षेत्रासाठी शुल्क आकारणी (अनु. क्र. ०३-ब) च्या दुप्पट व उर्वरीत करीता १००% रक्कम आकारावी.

रेखांकन किंवा रेखांकनातील खुला भूखंड गुंठेवारी अंतर्गत नियमाधीन करणेसाठी वरील तक्त्यामधील अनु. ०१ ते ०३ प्रमाणे शुल्काची आकारणी करावी.

**टिप** :- ज्या वसाहतीचा दर हा सिध्द शिघ्र गणक दर तक्त्यात उपलब्ध होणार नाही. अशा वसाहतीमधील मिळकतीसाठी शुल्क आकारणी करीता सिध्द शिघ्र गणकाचा मानीव दर रु. ७,०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे राहील. भविष्यात राज्य शासनाने संपूर्ण महाराष्ट्रासाठी दर आकारणी बाबत (शुल्क आकारणी बाबत) शासन निर्णय पारीत केल्यास व शासनाचे दर महानगरपालिकेच्या धोरणात्मक निर्णयापेक्षा जास्त असल्यास शासनाचे दर अंतिम ठरतील.

II. नियमितीकरणासाठी एफ.एस.आय. मर्यादा :-

- नियमितीकरण हे केवळ अधिकृत बांधकामांना अनुज्ञेय असलेल्या F.S.I. मर्यादे प्रमाणेच F.S.I. मर्यादा १.१ मध्येच करण्यात येईल. यापेक्षा जास्त अतिरिक्त F.S.I.चे बांधकाम पेड F.S.I. मध्ये देय मर्यादेत नियमितीकरण करण्यात येईल.
- विकास नियंत्रण नियमावली UDCPR (Unified Development Control & Promotion Regulation ) मधील तरतूदी नुसार ९.०० मीटर व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावर नियमित बांधकाम परवानगी देतांना मूळ देय F.S.I.चा वापरा सोबत नजराणा शुल्क (Primium) ची आकारणी करुन अतिरिक्त ५०% क्षेत्रफळ म्हणजेच ०.५० F.S.I. क्षेत्राचे वाढीव बांधकाम देय करण्यात येते. तसेच ॲन्सलरी F.S.I. देण्यात येतो. त्याचप्रमाणे नियमितीकरणात F.S.I देय करण्यात येईल.
- त्याच धर्तीवर गुंठेवारी विकास नियमितीकरण करतांना गुंठेवारी धारकाने प्रत्यक्षात केलेले बांधकाम म्हणजेच एकूण F.S.I. मर्यादेत नियमिती करण्यात येईल. (मुळ देय F.S.I. १.१ अधिक ॲन्सलरी F.S.I. ०.६ अधिक देय असल्यास प्रीमियम पेड F.S.I. ०.५ या F.S.I.¨ मर्यादेत नियमित करण्यात येईल.)
- त्यासाठी प्रिमीयमचा दर सुध्दा नियमित बांधकाम परवानगीसाठी आकारण्यात येते तितकाच आकरण्यात येईल.
- परंतु अनधिकृत बांधकामाना प्रोत्साहन मिळू नये या करिता एकूण देय F.S.I. मर्यादे पेक्षा जास्तीचा गुंठेवारी विकास (बांधकाम) नियमित केला जाणार नाही. व जास्तीचे बांधकाम निष्काशीत करण्यात येईल.

III गुंठेवारी विकास नियमितीकरण सुधारणा अधिनियम २०२१ ची अंमलबजावणी करणेसाठी महानगरपालिकेने जा.क्र./मनपा/आस्था-१/८७८/२०२१ दि. १८/०६/२०२१ यानुसार गुंठेवारी कक्ष प्रमुख व सहय्यक गुंठेवारी कक्ष प्रमुख व तांत्रिक कर्मचारी या पदावर कर्मचाऱ्यांची पदस्थापना केली आहे. या करीता मान्यता व्हावी.

IV. गुंठेवारी सुधारणा अधिनियम-२०२१ ची अंमलबजावणी करणेसाठी गुंठेवारी संचिका तयार करणे व त्याबाबत मंजुरी करीता प्रशासनास सहाय्यभुत होणे या कामासाठी विविध एजन्सीची Empanelment तयार करणे व या गटातील आर्किटेक्ट, व्यावसाईक अभियंते, सुपरवायझर यांना केलेल्या कामाबाबत पात्र गुंठेवारी प्रस्ताव दाखल केल्यानंतर गुंठेवारी धारकाने जमा केलेल्या रक्कमेच्या १०% रक्कम मानधन किंवा कामाचा मोबदला म्हणून पात्र संचिकांसाठी (१५०.०० चौ.मी. पर्यंत भूखंड क्षेत्रफळ असलेल्या) गुंठेवारी संचिकांबाबत एजन्जीस देण्यात येईल. तसेच ज्या गुंठेवारी मिळकतींचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. पेक्षा जास्त असेल अशा भूखंडाच्या बाबत एजन्सीसाठी मानधन /मोबदल्याची रक्कम ही पात्र गुंठेवारी मिळकतीच्या वसुल होणाऱ्या रक्कमेच्या ७% राहील तसेच वरील मानधनाची कमाल मर्यादा रक्कम रु. ५०,०००/- पर्यंत राहील.

जे मिळकतधारक गुंठेवारी सुधारणा अधिनियम-२०२१ प्रमाणे गुंठेवारी नियमितकरणास पात्र असतील तरीही दि. ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत गुंठेवारी नियमितीकरणाचा प्रस्ताव सादर करणार नाहीत त्यांच्यावर रितसर कायदेशीर कार्यवाही करुन अनाधिकृत बांधकामे पाडण्यासाठी अतिक्रमण निर्मुलन विभागात स्वंतत्र पथक तयार करुन अशा गुंठेवारी विकासावर कार्यवाही करण्यात येईल.

वरील प्रमाणे I ते IV मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे गुंठेवारी विकास नियमितीकरणा करण्यासाठी धोरणात्मक निर्णय होणेसाठी मान्यता देण्यात यावी.

**ठराव क्रमांक १८१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ मधील सुधारणा २०२१ ची अंमलबजावणी करणेसाठी व इतर बाबींसाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रस्तावातील अनुक्रमांक I ते IV सर्व मुद्यांना धोरणात्मक निर्णय म्हणून मान्यता देण्यात येते. पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**प्रस्ताव क्रमांक १८२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१०.०८.२०२१)**

मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका तर्फे नागरी खेळाडू यांच्या करिता नागरी क्रीडा केंद्र, क्रीडा संकूल, खेळाची मैदाने उपलब्ध केलेले आहे.

त्या अनुषंगाने शहरातील शासकिय व खाजगी तत्वावर उपलब्ध असलेल्या क्रीडा केंद्र व क्रीडा संकूल येथील क्रीडा सुविधा साठी आकारण्यात येणारे शुल्क व मनपा मार्फत आकारण्यात येणारे शुल्क यामध्ये तफावत असल्याने मनपाच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिके तर्फे खालील प्रमाणे नागरी क्रीडा केंद्र, क्रीडा संकूल येथील उपलब्ध खेळाचे सुधारित दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र | खेळाचे नाव | प्रशिक्षण शुल्क | सांघीक शुल्क | स्पर्धा शुल्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | बॅडमिंटन | १५००/- ०८ खेळाडू पर्यंत प्रति तास (१ महिना) | २०००/- ०५ व्यक्ती प्रति तास (१ महिना) | ३०००/- प्रति दिवस | ०८ व ०५ खेळाडू नंतर रु.३००/- प्रति खेळाडू |
| २ | टेबल टेनिस | ८००/- ०८ खेळाडू पर्यंत प्रति तास (१ महिना) | १०००/- ०५ व्यक्ती प्रति तास (१ महिना) | २०००/- प्रति दिवस | ०८ व ०५ खेळाडू नंतर रु.३००/- प्रति खेळाडू (मॅचेस ची वेळ सकाळी ०९:०० ते सायं ०५:०० पर्यंत) |
| ३ | लॉन टेनिस | ४०००/- १० खेळाडू पर्यंत प्रति तास (१ महिना) | ३०००/- ०८ व्यक्ती प्रति तास (१ महिना) | ४०००/- प्रति दिवस १ कोर्ट | १० व ०८ खेळाडू नंतर रु.५००/- प्रति खेळाडू |
| ४ | बास्केट बॉल | २०००/- १५ खेळाडू पर्यंत प्रति तास (१ महिना) | १५००/- टिम (१ महिना) | ३०००/- प्रति दिवस | १५ खेळाडू नंतर प्रति खेळाडू रु.३००/- |
| ५ | स्केटिंग | २०००/- १५ खेळाडू पर्यंत प्रति तास (१ महिना) | ३००/- प्रति व्यक्ती (१ महिना) | ३०००/- प्रति दिवस | १५ खेळाडू नंतर रु.३००/- प्रति खेळाडू |
| ६ | क्रिकेट | २०००/- २० खेळाडू पर्यंत ०३ तास (१ महिना) | १५००/- टिम (१ महिना) | २०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रु.२००/- प्रति खेळाडू |
| ७ | मल्टी जिम | २००/- प्रति व्यक्ती (१ महिना) | ----- | ----- | मनपाच्या मालकीच्या जिममध्ये |
| ८ | योगा | २०००/- २० खेळाडू पर्यंत प्रति तास (१ महिना) | ----- | ३०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रु.२००/- प्रति खेळाडू |
| ९ | कराटे / ज्युदो | १५००/- १५ खेळाडू पर्यंत (१ महिना)प्रति | ----- | ३०००/- प्रति दिवस | १५ खेळाडू नंतर रु.२००/- प्रति खेळाडू |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | तास | | | |
| १० | व्हॉली बॉल | १०००/- १५ खेळाडू पर्यंत ०३ तास (१ महिना) | १०००/- १५ खेळाडू टिम (१ महिना) | २०००/- प्रति दिवस | १५ खेळाडू नंतर रु.१००/- प्रति खेळाडू |
| ११ | डान्स/ ॲरोबिक्स | २०००/- २० खेळाडू पर्यंत प्रति तास (१ महिना) | ----- | ३०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रु.३००/- प्रति खेळाडू |
| १२ | जिम्नॅस्टीक | १५००/- १५ खेळाडू २ तास (१ महिना) | ----- | ३०००/- प्रति दिवस | १५ खेळाडूनंतर रु.२००/- प्रति खेळाडू |
| १३ | तलवार बाजी | ३०००/- २० खेळाडू प्रति तास (१ महिना) | ----- | ३०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रु.३००/- प्रति खेळाडू |
| १४ | बॉक्सींग | २०००/- १५ खेळाडू प्रति तास (१ महिना) | ----- | ३०००/- प्रति दिवस | १५ खेळाडू नंतर रु.३००/- प्रति खेळाडू |
| १५ | हॉकी | १५००/- २० खेळाडू प्रति ०३ तास (१ महिना) | ----- | २०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रू.१००/- प्रति खेळाडू |
| १६ | फुटबॉल | १५००/- २० खेळाडू प्रति ०३ तास (१ महिना) | ----- | २०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रु.१००/- प्रति खेळाडू |
| १७ | कुस्ती | २०००/- २० खेळाडू प्रति ०२ तास (१ महिना) | ----- | २०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रु.२००/- प्रति खेळाडू |
| १८ | कॅरम | २०००/- २० खेळाडू प्रति ०२ तास (१ महिना) | ----- | २०००/- प्रति दिवस | २० खेळाडू नंतर रु.१०० प्रति खेळाडू |
| १९ | कबड्डी | १५००/- १५ खेळाडू प्रति ०३ तास (१ महिना) | ----- | २०००/- प्रति दिवस | १५ खेळाडू नंतर रु.१०० प्रति खेळाडू |
| २० | खो-खो | १५००/- १५ खेळाडू प्रति ०३ तास (१ महिना) | ----- | २०००/- प्रति दिवस | १५ खेळाडू नंतर रु.१००/- प्रति खेळाडू |
| २१ | इनडोअर खेळ १ | २०००/- १५ खेळाडू (१ महिना) | २५००/- (१ महिना) | ३०००/- प्रति दिवस | १५ संघ खेळाडू नंतर प्रति खेळाडू ३००/- रु |
| २२ | आऊट डोअर खेळ | १५००/- १५ खेळाडू २ तास (१ महिना) | १५००/- (१ महिना) | २०००/- प्रति दिवस | वेळ सकाळी ०९:०० ते सायं ०५:०० पर्यंत |
| २३ | निवड चाचणी इनडोअर हॉल | २०००/- रु २० खेळाडू ०२ तास प्रति दिवस | २०००/- ०२ तास प्रति दिवस | ----- | २० खेळाडू नंतर रु.२००/- प्रति खेळाडू |
| २४ | निवड चाचणी आऊट डोअर हॉल | १५००/- रु ३० खेळाडू पर्यंत २ तास प्रति दिवस | १५००/- २ तास प्रति दिवस | ०२ तास करिता | ३० खेळाडू नंतर रु.२००/- प्रति खेळाडू |

हॅप्पी हावर्स

| **अ.क्र** | **खेळाचे नाव** | **फॅमिली / ग्रुप** | **वेळ** | **फिस** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे इनडोअर हॉल | एकूण ०४ व्यक्तीसाठी | ०२ तास | ६००/- रु प्रति दिवस | ०४ मेंबर नंतर प्रत्येकी १५०/- रु अतिरिक्त |
| २ | मनपाचे आऊट डोअर हॉल | १० व्यक्तींसाठी | ०२ तास | ५००/- रु प्रति दिवस | १० मेंबर नंतर प्रत्येकी ५०/- रु अतिरिक्त |

वरिल प्रमाणे नागरी क्रीड केंद्र व संकूल येथील दर प्रस्तावित करण्यात आलेले असून त्याची नियमावली अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.

**नियमावली**

१. सिटीजन्स स्पोर्टस् क्लब अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या क्रीडा केंद्रात प्रवेश देण्याचे सर्व अधिकार महानगरपालिके कडे राखून ठेवण्यात आले आहे.
२. क्रीडा केंद्र करिता राखीव असणाऱ्या वेळेनुसारच सभासदत्त्व देण्यात येईल.
३. सभासदास सभासदत्व देण्यात आल्यावर त्यांना ओळखपत्र देण्यात येईल व त्यासाठी सभासद व खेळाडू यांना वार्षिक नोंदणी फिस रक्कम रु.३००/- (अक्षरी तिनशे रुपये फक्त) भरणा करणे अनिवार्य राहिल.
४. ओळखपत्र असल्याशिवाय सभासदांना क्रीडा केंद्राचा लाभ घेता येणार नाही.
५. सभासद शुल्क भरल्यानंतर खेळासाठी लागणारे साहित्य हे सभासदांनी स्वतः आणावे लागेल.
६. एकदा सभासदत्व घेतल्यानंतर त्या वेळेनुसार ते पुढे चालू ठेवायचे असल्यास दर महिन्याच्या १० तारखेच्या आत पुढील शुल्क केंद्र प्रमुखांकडे भरणा करणे आवश्यक राहिल. भरणा न केल्यास त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात येईल.
७. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना केंद्रावर व मैदानावरील कोणत्याही कोचिंग मध्ये विनामुल्य प्रवेश असेल.
८. क्रीडा केंद्रात खेळत असतांना सभासदांच्या गैरवर्तणुकीमुळे केंद्राचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्या सभासदांकडून, खेळाडू किंवा प्रशिक्षका कडून नुकसान भरपाई भरुन घेण्यात येईल.
९. महानगरपालिकेस क्रीडा केंद्राची आवश्यकता असल्यास सभासदांना आधी सुचना देऊन क्रीडा केंद्र वापरण्यात येईल.
१०. क्रीडा केंद्रावर खेळतांना कोणताही अपघात/दुर्घटना घडल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
११. स्वतःच्या मोल्यवान वस्तुंची जबाबदारी सभासदांची राहिल.
१२. क्रीडा केंद्रावर सकाळचे सत्रात लोकांना सभासदत्व देण्यात येईल.
१३. सायंकाळी ०५:०० ते ०९:०० ही वेळ प्रत्येक केंद्रावर विद्यार्थ्यांना कोचिंग कॅम्प करिता राखून ठेवण्यात आली आहे.
१४. सभासद शुल्क भरल्यानंतर कोणत्याही कारणास्तव सभासद शुल्क मिळणार नाही.
१५. सभासदाने क्रीडा केंद्राच्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन अथवा गैरवर्तन केल्यास त्याचे सभासदत्व त्वरीत रद्द करण्याचा अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे राहिल.
१६. क्रीडा केंद्रात धुम्रपान, मद्यपान अशा प्रकारचे गैरवर्तन करतांना आढळून आल्यास सभासदत्व रद्द करुन रु.५००/- दंड आकारण्यात येईल.
१७. क्रीडा केंद्राच्या नियमावलीत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे राहतील तसेच झालेले बदल सभासदांवर बंधनकारक राहिल बदल झालेल्या नियमाबद्दल सभासदांना वेळोवेळी सुचित करण्यात येईल.
१८. क्रीडा केंद्र व मैदानावरील उपलब्ध वेळेनुसार वापरण्याच्या वेळा दिल्या जातील.
१९. प्रवेश घेऊ इच्छिणारा हा असाध्य रोगाने पिडीत नसावा, शारिरीक तंदुरुस्ती असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र जोडावे.
२०. महानगरपालिकेच्या क्रीडा केंद्रावर येतांना ओळखपत्र सोबत असणे बंधनकारक आहे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
२१. मासिक शुल्काचा कालावधी हा प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून पुढे ०१ महिन्या पर्यंत राहिल.
२२. विहीत नमुन्यातील क्रीडा विभागाने दिलेले ओळखपत्र हरविल्यास नविन ओळखपत्रासाठी रु.५०/- (अक्षरी पन्नास रुपये फक्त) रोख क्रीडा विभागात जमा करावे. नविन ओळखपत्र घेतल्याशिवाय

संकूल व मैदान वर कोणत्याही सुविंधाचा वापर खेळाडूस करता येणार नाही व स्वतःच्या ओळखपत्रावर दुसऱ्या व्यक्तीस खेळता येणार नाही.

२३. मनपाच्या क्रीडा संकूल व मैदानावर स्पर्धा असल्यास त्या कालावधीत खेळाडू व सदस्य यांना सराव करता येणार नाही.

२४. नागरी क्रीडा केंद्र व संकूलावर उपलब्ध वेळेवर सराव मॅचसाठी त्या ठिकाणी कार्यरत असलेले मुख्य निमंत्रक यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यांनतर ॲडमिशन प्रक्रिया पूर्ण करुन लगेच परवानगी घेऊन त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी क्रीडा अधिकारी यांच्याकडे अर्ज व शुल्क भरणा करणेच्या अटीवर मान्यता देणे योग्य राहिल व क्रीडा अधिकारी मार्फत दर ०२ महिन्यात क्रीडा केंद्र व संकूलाचे अहवाल देण्यात येईल.

२५. महानगरपालिकेच्या मालकीच्या व्यायाम (जिम) शाळेत वार्षीक नोंदणी अर्ज आवश्यक असू नये फक्त ओळखपत्र/फॉर्म आवश्यक असणे व त्यासाठी रक्कम रु.५०/- (अक्षरी पन्नास रुपये फक्त) इतका वार्षिक भरणा करावा लागेल.

२६. क्रीडा संकूलातील हॉलमध्ये खेळा शिवाय इतर कार्यक्रमासाठी वापरता येणार नाही.

२७. क्रीडा विभागा अंतर्गत असलेल्या हॉलमध्ये स्पर्धेसाठी साफ-सफाई शुल्क रक्कम रु.५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) व अनामत रक्कम रु.२०००/- (अक्षरी दोन हजार रुपये फक्त) स्पर्धा संपन्न झाल्यानंतर वापर केलेल्या संपूर्ण जागेची साफ-सफाई करुन दिल्यांनतर अनामत रक्कम नियमानुसार परत करण्यात येईल.

२८. क्रीडा विभाग अंतर्गत असलेल्या हॉलमध्ये स्पर्धेसाठी प्रति दिवस सकाळी ०९:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत ॲडव्हान्स १०० रिडींगचे शुल्क भरणा आवश्यक राहिल.

**हॅप्पी हावर्स मधील नियमावली व भाडे दर.**

१. हॅप्पी हावर्स हा सकाळी १०:०० ते सायंकाळी ०४:०० वाजेपर्यंत राहिल.
२. हॅप्पी हावर्स कालावधी मध्ये शालेय/महाविद्यालय विद्यार्थ्यांना व कुटूंबासाठी एकूण ०४ जणांपर्यंत प्रति ०२ तास प्रति दिवस रक्कम रु.५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) इतका इनडोअर हॉलसाठी शुल्क आकारले जाईल.
३. हॅप्पी हावर्स मध्ये नोंदणी ओळखपत्राची आवश्यकता असून नये.
४. आऊट डोअर मध्ये मैदानावर १० जणांसाठी प्रति ०२ तास करीता प्रति दिवस ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) इतके भाडे आकारले जाईल.
५. हॅप्पी हावर्स किमान ०३ दिवस अगोदर अर्ज लिखीत स्वरुपात करणे आवश्यक राहिल.
६. वरिल प्रमाणे इनडोअर / आऊट डोअर मध्ये उपलब्ध असलेली सुविधा देण्यात येईल अतिरिक्त सुविधा देणार नाही. क्रीडा साहित्य अर्जदार यांनी स्वतः आणावे.
७. हॅप्पी हावर्स मधील इनडोअर/आऊट डोअर हे रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील चालू राहिल.
८. हॅप्पी हावर्स मध्ये येणारे विद्यार्थी/पालक यांना नागरी क्रीड केंद्र व मैदानावरील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

करिता वरिल प्रमाणे नागरी क्रीडा केंद्र, क्रीडा संकूल इत्यादी मनपा क्रीडा विभागा मार्फत चालविण्यात येणाऱ्या खेळाचे नविन प्रस्तावित दर मान्य करुन मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्याच्या संचिका मान्यतेस्तव तथा स्वाक्षरीस्तव सेवेत सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक १८२/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे नागरी खेळाडू यांच्या करीता नागरी क्रिडा केंद्र, क्रिडा संकुल, खेळाची मैदाने उपलब्ध केलेले असून शहरातील शासकिय व खाजगी तत्वावर उपलब्ध असलेल्या क्रीडा केंद्र व क्रीडा संकूल येथील क्रीडा सुविधा साठी आकारण्यात येणारे शुल्क व मनपा मार्फत आकारण्यात येणारे शुल्क यामध्ये तफावत असल्याने

मनपाच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिके तर्फे प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते २४ नुसार व हॅपी हावर्समध्ये १,२ मधील नागरी क्रिडा केंद्र, क्रीडा संकूल येथील उपलब्ध खेळाचे सुधारित प्रस्तावात नमुद केलेल्या दरास व नियमावली मधील अ.क्र.१ ते २८ नुसार आणि हॅपी हावर्स या संबंधीची प्रस्तावातील नमुद नियमावली मधील अ.क्र.१ ते ८ नुसार तसेच त्या संबंधीच्या प्रस्तावातील नमुद केलेल्या भाडे दरास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १८३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०८.२०२१)**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, दरवर्षी वर्ग-४ संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना प्रत्येकी दोन गणवेश देण्यात येते. या वर्षी लेखानुदान २१-२२ साठीची तरतुद ही "सफाई कर्मचारीसाठी गणवेश व तत्सम साहित्य खरेदी" या लेखा शिर्षात करण्यात आली आहे. वर्ग-४ संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना गणवेश खरेदी करण्यासाठी रु.६०.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. सदर वर्ग-४ संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांची गणवेशाच्या प्रकार निहाय प्राप्त कर्मचाऱ्यांची संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | गणवेशाचा प्रकार | कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | पांढरा गणवेश | २११ |
| २. | खाकी गणवेश | १६२७ |
| ३. | निळा गणवेश | ६१ |
| ४. | ६ वार साडी (गोल्डन ब्राऊन) व ब्लाऊज पीस | १८५ |
| ५. | ९ वार साडी (गोल्डन ब्राऊन) व ब्लाऊज पीस | २६८ |
| ६. | पांढरी साडी व ब्लाऊज पीस | ७० |
| ७. | पांढरी साडी (निळी बॉर्डर) व ब्लाऊज पीस | १० |
| ८. | शर्ट सलवार व ओढणी | ३० |

उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या संख्या प्राप्त झाली आहे. त्यानुसार गणवेश अधिनियम अंतर्गत झालेल्या तरतुदीनुसार प्रत्येक कर्मचाऱ्यांना दोन गणवेश या प्रमाणे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांनी निर्धारित केलेल्या दरानुसार गणवेश साहित्य खरेदीचे अंदाजपत्रक तयार केले असून वर्ग-४ स्त्री व पुरुष गणवेश खरेदीसाठी अंदाजे खर्च र.रु.३५,३८,७९१/- (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष अडोतीस हजार सातशे एक्यान्नव फक्त) इतका अपेक्षीत आहे. यासाठी "सफाई कर्मचारीसाठी गणवेश व तत्सम साहित्य खरेदी" या लेखाशिर्षातून अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त होणेस्तव. तसेच विहित निविदा पध्दतीचा अवलंब करून साहित्य खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १८३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध विभागांच्या प्राप्त वर्ग-४ संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २ गणवेश खरेदी करण्यासाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साहित्य पुरवठा करणेसाठी "सफाई कर्मचारीसाठी गणवेश व तत्सम साहित्य खरेदी" या लेखाशिर्षातून रु.३५,३८,७९१/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येते. विहित निविदा पध्दतीचा अवलंब करुन साहित्य खरेदी करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १८४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असून या केंद्रातून दररोज १५० दलली पाण्यावर

प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत विविध टप्प्यांवर तुरटी ग्रेड-१ ब्लिचींग पावडर ग्रेड-१ व क्लोरीनचा वापर केला जातो. पाणी गाळण प्रक्रियेनंतर पाण्याचे निर्जंतुकीकरण करून पाणी पिण्या योग्य करण्यासाठी क्लोरीनचा वापर प्रि-क्लोरीनेशन व पोस्ट क्लोरीनेशनच्या स्वरुपात केला जातो. प्रि-क्लोरीनेशन करीता १ पीपीएम व पोस्ट क्लोरीनेशन करीता ३ पीपीएम इतक्या मात्रेची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभ येथे देखील ०.५ पीपीएम इतकी क्लोरीनची मात्रा रि-क्लोरीनेशनच्या स्वरुपात दिली जाते. दैनंदिन प्रक्रिया करण्यात येणारे पाणी परिमाण व आवश्यक मात्रा लक्षात घेता, जलशुध्दीकरण केंद्राची क्लोरीनची वार्षिक मागणी २४६ मे.टन इतकी आहे.

सदरील पुरवठ्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२० च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्यातील दरानुसार दर पृथःकरण करून तयार करण्यात आले आहे. कामची अंदाजपत्रकीय र.रु.४०,७९,१७२/- इतकी असून सदरील पुरवठ्याचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आला आहे. करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्रासाठी वार्षिक क्लोरीन पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक र.रु.४०,७९,१७२/- मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १८४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता क्लोरीनचा पुरवठा करणे. या कामाचे अंदाजपत्रक र.रु.४०,७९,१७२/- च्या प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १८५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असून या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज १५० दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅसचा वापर विविध टप्प्यांवर केला जातो. जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी तुरटी ग्रेड-१ चा वापर केला जातो. तसेच पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी प्रि-क्लोरीनेशन व पोस्ट-क्लोरीनेशन व पोस्ट क्लोरीनेशनच्या स्वरुपात क्लोरीन गॅस व ब्लिचींग पावडरचा वापर केला जातो. जलशुध्दीकरण केंद्र येथे ब्लिचींग पावडर ग्रेड-१ चा वापर प्रि-क्लोरीनेशन करीता तसेच वितरण प्रणाली अंतर्गत असलेल्या विविध जलकुंभांवर आवश्यकतेनुसार केला जातो. प्रि-क्लोरीनेशन करीता १ पीपीएम इतकी ब्लिचींग पावडरची मात्रा वापरावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात तसेच धरणातील पाणी पातळी कमी झाल्यानंतर या मात्रेत आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येते. या सर्व बाबींचा विचार करता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राची वार्षिक मागणी ही १९० मे.टन इतकी आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन २०१९-२० च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्या करीता असलेल्या बाबींनुसार दरपृथःकरण करून तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु.४९,९०,६९२/- इतकी आहे. सदरील काम रसायन सामुग्री खरेदी या लेखा शिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आली आहे.

करीता, अंदाजपत्रक र.रु.४९,९०,६९२/- चे मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १८५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता ब्लिचींग पावडर ग्रेड-१ चा पुरवठा करणे. या कामाचे अंदाजपत्रक र.रु.४९,९०,६९२/- च्या प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १८६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र आहे. या जलशुध्दीकरण केंद्रा करीता २७ एकर जमिनीचे क्षेत्रफळ आहे. जलशुध्दीकरण केंद्राचे विविध उपांगे व कर्मचारी निवासस्थान करीता अंतर्गत रहदारीकरीता डांबरी रस्ते आहेत.

सन-१९९८ साली औरंगाबाद पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर सन २००४-०५ साली या रस्त्यांचे पुर्न डांबरीकरण करण्यात आलेले आहे. तद्नंतर या रस्त्यांची दुरुस्ती किंवा डांबरीकरण करण्यात आलेले नाही. सुमारे १६ वर्षामध्ये अंतर्गत रस्ते व दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रांना जोडणारे मुख्य रस्ते खराब झालेले असून या रस्त्यांचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे गरजेचे आहे.

अंतर्गत रस्त्यांपैकी दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रांना जोडणारे मुख्य रस्ते हे रसायन वाहतूक व देखभाल दुरूस्तीकरीता लागणाऱ्या साहित्याच्या वाहतुकीकरीता महत्वाचे असल्याने या रस्त्यांच्या डांबरीकरणाचे व मजबुतीकरणाचे अंदाजपत्रक भाग-१ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१९-२० च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय र.रु.२९,६०,३००/- इतकी आहे. जायकवाडी स्थापत्य या उप विभागाला अर्थसंकल्प अंतर्गत देखभाल दुरुस्तीसाठी एकत्रित तरतुद उपलब्ध होत असल्याने सदरील कामाचा खर्च जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे.

करीता, अंदाजपत्रक र.रु.२९,६०,३००/- चे मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १८६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे (भाग-१) कामाचे अंदाजपत्रक र.रु.२९,६०,३००/- चा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १८७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१३.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षणातून विविध ठिकाणी मिळालेल्या इमारती व हॉलसाठी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. न.भु.क्र.१६०३१/४ व १६०३१/पी, श्रेयनगर बिल्डींग, आरक्षण २८९, शॉपिंग सेंटर व वाचनालय आरक्षण, तळ मजला उत्तर बाजु साठी दर रु.४८४०/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री.संजोग दिवाकर बडवे यांचे निविदा दर प्रती माह र.रु.६०५०/- आहे.
२. न.भु.क्र.१६०३१/४ व १६०३१/पी, श्रेयनगर बिल्डींग, आरक्षण २८९, शॉपिंग सेंटर व वाचनालय आरक्षण, तळ मजला उत्तर मध्य बाजु साठी दर रु.४८४०/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्रीमती सुरेखा किशोर थोरात यांचे निविदा दर प्रती माह र.रु.८२२८/- आहे.

३. न.भु.क्र.१६०३१/४ व १६०३१/पी, श्रेयनगर बिल्डींग, आरक्षण २८९, शॉपिंग सेंटर व वाचनालय आरक्षण, तळ मजला दक्षिण मध्य बाजु साठी दर रु.४८४०/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री.संजोग दिवाकर बडवे यांचे निविदा दर प्रती माह र.रु.५१३०/- आहे.

४. न.भु.क्र.१६०३१/४ व १६०३१/पी, श्रेयनगर बिल्डींग, आरक्षण २८९, शॉपिंग सेंटर व वाचनालय आरक्षण, तळ मजला दक्षिण बाजु साठी दर रु.५३३७/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री.सय्यद इमरान सय्यद तौफीक यांचे निविदा दर प्रती माह र.रु.७४७२/- आहे.

५. न.भु.क्र.१६०३१/४ व १६०३१/पी, श्रेयनगर बिल्डींग, आरक्षण २८९, शॉपिंग सेंटर व वाचनालय आरक्षण, स्टिल पहिला मजला साठी दर रु.२४,८०९/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्रीमती प्रियंका अमित नघाटे यांचे निविदा दर प्रती माह र.रु.२८,५३०/- आहे.

६. न.भु.क्र.१६०३१/४ व १६०३१/पी, श्रेयनगर बिल्डींग, आरक्षण २८९, शॉपिंग सेंटर व वाचनालय आरक्षण, पहिला मजला साठी दर रु.१४,३८८/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्रीमती प्रियंका अमित नघाटे यांचे निविदा दर प्रती माह र.रु.१६,५४६/- आहे.

करीता, वरील प्रमाणे निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार मा.स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक यांच्याकडे असल्याने मा.प्रशासक यांच्याकडे मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १८७/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षणातून विविध ठिकाणी मिळालेल्या इमारती व हॉलसाठी निविदा मागविण्यात आल्या असून प्रस्तावात नमुद असलेल्या उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेच्या तपशीलासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १८८/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१३.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना रोगाच्या फैलावावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य शासनाने रु.२००.०० लक्ष निधी महानगरपालिकेस प्रदान केला आहे. सदरील निधी मधुन रुग्णवाहिका व रेफ्रीजरेटर्स, आईस लाईन रेफ्रीजरेटर्स, डिप फ्रिजर्स खरेदी करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यतेचा ठराव क्र.११९ दि.२४.०४.२०२१ नुसार अंदाजपत्रकास मान्यता घेऊन जीईएम पोर्टलद्वारे रुग्णवाहिका खरेदी व जाहीर निविदेद्वारे इतर साहित्य खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४/ दि.२४ ऑगस्ट २०१७ नुसार खरेदीदार विभागांना पोर्टलवरील उपलब्ध असलेली वाहने खरेदी करण्यास मुभा आहे. त्याप्रामणे जीईएम पोर्टलवरून SML ISUZU कंपनीच्या ०६ बेसिक ॲम्ब्युलन्स प्रतिनग रु.१३,१२,५००/- दराने रु.७८,७५,०००/- रुपयात आणि ०२ कार्डियाक ॲम्ब्युलन्स प्रतिनग रु.१९,२५,०००/- दराने रु.३८,५०,०००/- रुपयात खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

तसेच कार्डियाक ॲम्ब्युलन्स मधील उपकरणे पुरवठा करणे व बसवुन देणे या कामासाठी जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | अंदाजपत्रकीय र.रु. | एजन्सीचे नाव | प्राप्त दर रुपये |
|---|---|---|---|---|
| | कार्डियाक ॲम्ब्युलन्स मधील | | मे.रॉयल एअरकॉन | १९,९३,२३९/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | उपकरणे : (Transport ventilator, Syring infusion pump, Cardic Defebrilator, Patient Monitor, Suction machine, Ventilator kit, Oxygen cylinder, fridge, Wash basin, Powre Inverter, B.P. machine etc.) पुरवठा करणे व बसवुन देणे. | १९,९३,०४०/- | औरंगाबाद | |
| | | | मे.स्विसमॅटीक बिजनोर (U.P.) | २०,३२,९००/- |

सदरील कामासाठी मे.रॉयल एअरकॉन यांनी वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची तयारी दर्शविली असून त्यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी असल्याने स्विकृत करणे योग्य होईल.

तसेच रेफ्रीजरेटर्स, आईस लाईन रेफ्रीजरेटर्स, डिप फ्रिजर्स खरेदी करण्यासाठी जीईएम पोर्टलद्वारे निविदा मागविल्या असता, खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | अंदाजपत्रकीय र.रु. | एजन्सीचे नाव | प्राप्त दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | -२०० लि.क्षमतेचे ५० रेर्फिजरेटर्स<br>-३०० लि.क्षमतेचे १० आईस लाईन रेर्फिजरेटर्स<br>-५०० लि.क्षमतेचे ०५ डिप फ्रिजर्स पुरवठा करणे | ४५,९९,४९३/- | मे.ओम एन्टरप्राईजेस, अहमदनगर | ४५,९८,५००/- |
| | | | मे.स्टार एन्टरप्राईजेस, औरंगाबाद | ४६,९५,०००/- |
| | | | मे.प्रो-निल इफेक्ट सर्व्हिसेस, पुणे | ४७,४०,०००/- |

या कामासाठी प्राप्त ०३ निविदांपैकी मे.ओम.एन्टरप्राईजेस यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.९९३/- ने कमी असून तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची असल्याने स्विकृत करणे योग्य होईल.

उपरोक्त प्रमाणे जीईएम पोर्टलद्वारे रुग्णवाहीका खरेदीसाठी झालेल्या खर्चास तसेच इतर वरील दोन कामांसाठी प्राप्त न्युनतम दरास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १८८/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीईएम पोर्टलवरुन खरेदी करण्यात आलेल्या SML ISUZU कंपनीच्या ०६ बेसिक ॲम्ब्युलन्स खरेदी र.रु.७८,७५,०००/- आणि ०२ कार्डियाक ॲम्ब्युलन्स खरेदी र.रु.३८,५०,०००/- खर्चास मान्यता देण्यात येते. तसेच निविदा प्रक्रियेअंती कार्डियाक ॲम्ब्युलन्स मधील उपकरणे पुरवठा करून बसविण्याचे काम मे.रॉयल एअरकॉन, यांच्या कडून अंदाजपत्रकीय दर र.रु.१९,९३,०४०/- प्रमाणे करून घेण्यास तसेच रेफ्रीजरेटर्स, आईस लाईन रेफ्रीजरेटर्स, डिप फ्रिजर्स हे साहित्य मे.ओम एन्टरप्राईजेस यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.९९३/- कमी दराने अर्थात रु.४५,९८,५००/- मध्ये खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १८९/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२०.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प सन २०२१-२२ अंतर्गत कार्यकारी अभियंता विभाग, उपअभियंता कार्यालय-०८ करीता सन २०२१-२२ च्या मुळ

अर्थसंकल्पात महसुली खर्च क अंदाजपत्रक पृष्ठ क्र.Ward-08-ABS-2 नुसार लेखाशिर्ष नाला सफाईसाठी र.रु.२५.०० लक्ष रकमेची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

झोन क्र.०८ अंतर्गत सातारा देवळाई सह एकुण ९ वॉर्ड असुन देखभाल दुरुस्ती (जलनि:स्सारण) या लेखाशिर्षामध्ये अंदाजपत्रक तरतुद र.रु.८०.०० लक्ष ठेवण्यात आलेली आहे. जलनि:स्सारण कामासाठी ठेवलेली आर्थिक तरतुद ही आतापर्यंतच्या ड्रेनेजच्या आवश्यक असलेल्या कामांसाठी वापरण्यात आली आहे. त्यामुळे झोन क्र.०८ करीता जलनि:स्सारण देखभाल दुरुस्तीसाठी तरतुद शिल्लक राहीलेली नाही.

या वर्षी नाला सफाईची कामे डिपार्टमेंटली केलेली असल्याने रु.२५.०० लक्ष रक्कमेची आवश्यकता नाही. साधारणत: नाले सफाईसाठी रु.५.०० लक्ष रक्कमेची आवश्यकता आहे. तरी उर्वरित रु.२०.०० लक्ष रक्कम ही झोन क्र.०८ मधील विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहिन्या देखभाल दुरुस्ती यासाठी वळती करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | नाला सफाईसाठी लागणारी रक्कम | वळती करावयाचे लेखाशिर्षक व रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अर्थसंकल्प २०२१-२२ लेखाशिर्ष नाला सफाई झोन क्र.०८ साठी<br>-एकुण तरतुद र.रु.२५.०० लक्ष | रु.५.०० लक्ष | देखभाल दुरुस्ती (जल नि:स्सारण) रु.२०.०० लक्ष |

**ठराव क्रमांक १८९/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २०२१-२२ लेखाशिर्ष नाला सफाई मधील उर्वरित र.रु.२०.०० लक्ष ही झोन क्र.०८ मधील देखभाल दुरुस्ती जलनि:स्सारण या लेखाशिर्ष अंतर्गत कामांसाठी वळती करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९०/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-२ राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दि.११.१.२००७ विषय क्र.६५५/४ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम सन २००७ ते २०१२ या कालावधी करिता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यते नुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्रं.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-१७/२०१७२-४४/०७ दि.२६.३.२००७ प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यू व बालमृत्यु एकूण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.स्थायी समिती सभा दि.२३.०३.२०२१ विषय क्रमांक १०८ अन्वये आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत एकूण २६ (वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी) यांना दि.२.२.२०२१ ते ३१.७.२०२१ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दिनांक ३१.७.२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल. यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे.

मा.स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद ठराव क्र.३३९ दि.२०.३.२०१८ व ठराव क्र.६६ दि.१३.२.२०२० च्या मंजूरीनुसार एनएचएम नुसार वेतन व ५ टक्के वाषिक वेतनवाढ देण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणा-या ठराविक वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | नांव | पदनाम | ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ.वैशाली मुदगडकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.६३०००/- |
| ०२ | श्रीमती जया उघडे | स्टाफ नर्स | रु.२१०००/- |
| ०३ | श्रीमती सुनिता गणपत नरवडे | स्टाफ नर्स | रु.२१०००/- |
| ०४ | श्रीमती विद्या राजू शर्मा | स्टाफ नर्स | रु.२१०००/- |
| ०५ | श्रीमती ज्योती रामचंद्र बनकर | स्टाफ नर्स | रु.२१०००/- |
| ०६ | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु.२१०००/- |
| ०७ | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.१८०००/- |
| ०८ | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु.१८०००/- |
| ०९ | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.१८०००/- |
| १० | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.१८०००/- |
| ११ | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु.१८०००/- |
| १२ | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.१८०००/- |
| १३ | श्रीमती सोनाली पावलस भिसे | एएनएम | रु.१८०००/- |
| १४ | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.१८०००/- |
| १५ | श्रीमती वर्षा महादू सोनवणे | एएनएम | रु.१८०००/- |
| १६ | श्रीमती सुनंदा नामदेव चव्हाण | एएनएम | रु.१८०००/- |
| १७ | श्रीमती सारिका मनोहर इंगळे | एएनएम | रु.१८०००/- |
| १८ | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु.१८०००/- |
| १९ | श्रीमती वैशाली चिंतामण बि-हारे | एएनएम | रु.१८०००/- |
| २० | श्रीमती सिमा अरुण गुरव | एएनएम | रु.१८०००/- |
| २१ | श्रीमती समिनाबेगम शेख सलीम | एएनएम | रु.१८०००/- |
| २२ | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु.१८०००/- |
| २३ | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु.१८०००/- |
| २४ | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.१८०००/- |
| २५ | श्रीमती प्रिंयका चंद्रकांत मगरे | एएनएम | रु.१८०००/- |
| २६ | श्रीमती अग्नेस जे.मकासरे | एएनएम | रु.१८०००/- |

सध्या कार्यरत १ वैद्यकीय अधिकारी व २५ कर्मचारी यांना वेतनाकरिता रु.५२३०००/- व वार्षिक खर्च रु.६२,७६,०००/-अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकामध्ये करण्यात आलेली आहे. आरसीएच-२ अंतर्गत सध्या कार्यरत १ अधिकारी व २५ कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनांक ३.८.२०२१ ते ३१.१.२०२२ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व

वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक १९०/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्ताव दशविल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-२ राबविण्यासाठी आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत ठराविक वेतनावरील अ.क्र.१ ते २६ अधिकारी व कर्मचारी यांना १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक ३.८.२०२१ ते ३१.१.२०२२ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व प्रस्तावामध्ये दर्श्वविलयानुसार एनएचएम नुसार ठराविक वेतन मनपा फंडातून वेतन अदा करण्यास मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९१/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२४.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रतिवर्षी पावसाळ्यात शासनाने दिलेल्या उद्दिष्टानुसार औरंगाबाद मनपाच्या विविध खुल्या जागा, शालेय इमारती, दवाखाने, रस्त्यांच्याकडेला वृक्ष लागवड करून पर्यावरण संतुलन राखणे करीता उद्यान विभागामार्फत उपाय योजना केली जाते.

उद्यान विभागामार्फत दरवर्षी स्वतःच्या सिध्दार्थ नर्सरित मनपा कर्मचाऱ्यांमार्फत भारतीय वंशावळीची विविध प्रजातीची सावली देणारी जवळपास ५० हजार रोपे (५ इंच x १० इंच) पिशवीत माती भरुन प्रत्येक प्रभागातील स.नगरसेवक, सामाजिक संस्थांना व नागरीकांना विनामुल्य रोपे वितरीत केली जातात. सदरील रोपे निर्मीती करण्यासाठी प्रतिवर्षी माहे मार्च पासून तयारी केली जाते. त्यात नर्सरी पिशव्या, पोयटा माती, खत विकत घेऊन ही रोपे तयार केली जातात. मात्र सदरील रोपे विनामुल्य असल्याने त्यासाठी किती रोपे वितरीत करायची? यासाठी कुठलेही नियम नसल्याने माहे ऑगस्ट पुर्वीच ही रोपे संपतात. या कारणाने कीही वृक्षप्रेमी रोपे मिळण्यापासून वंचित राहतात.

उद्यान विभागाने या बाबत सविस्तर अभ्यास केला असून वन विभागात ज्या शासकीय नाममात्र दराने रोपांची विक्री केली जाते. त्या शासन निर्णयाची प्रत वन विभागाकडून प्राप्त करून संचिकेत लावली आहे. कृपया अवलोकन व्हावे. त्यानुसार प्रत्येक स.नगरसेवकांच्या प्रभागात १०० रोपे विनामुल्य देणे ठरल्यास ११४ x १००=११,४०० रोपे लागतात व या कामी एक स्वतंत्र कर्मचारी नेमुन त्याचा हिशोब ठेऊन वन महोत्सव १५ जुन ते ३० सप्टेंबर या कालावधीत उर्वरित रोपे (५ इंच x १० इंच) ही आकाराची रोपे ही शासकीय दराने रु.१०/- प्रती रोप व यानंतरच्या कालावधीसाठी रु.२१/- प्रती रोप देऊन त्याचा लेखा जोखा ठेवल्यास यावर नियंत्रण राहून ना नफा ना तोटा या तत्वावर ही रोपे वितरीत करता येतील.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १९१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यानातील  नर्सरीत विभागामार्फत भारतीय वंशावळीची विविध प्रजातींची सावली देणारी रोपे प्रत्येक स.नगरसेवक प्रभागात दरवर्षी लागवडीसाठी १०० रोपे विनामुल्य देणे व शहरातील नागरीका/वृक्षप्रेमी यांना १५ जुन ते ३० सप्टेंबर या कालावधीत वन विभागाच्या शासकीय मान्य दराने रु.१०/- प्रती रोप व या नंतरच्या कालावधीत रु.२१/- प्रती रोप या दराने ना नफा ना तोटा या तत्वावर ही रोपे विक्री करणे व त्याचा लेखाजोखा ठेवणे करीता मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२४.०८.२०२१)**

विभाग प्रमुख तथा उपआयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिध्दार्थ प्राणी संग्रहालयाची निमिर्ती सन १९८५ साली झाली. त्यावेळी या ठिकाणी सर्व डांबरी रस्ते तयार करण्यात आलेले आहेत. प्राणी संग्रहालयात येणाऱ्या जडवाहनांमुळे अंतर्गत रस्त्यांवर ब-याच ठिकाणी खड्डे पडले आहेत. तेव्हापासून आजमितीपर्यंत या डांबरी रस्त्यांची देखभाल दुरुस्ती अथवा पुनःडांबरीकरण झालेले नाही. सेंट्रल झु ॲथॉरिटी, दिल्ली यांच्या कमिटीने या ठिकाणी पाहणी करून या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे बाबत सुचना केल्या आहेत. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सदरील कामासाठी असलेल्या तरतुदीतून लेखा विभागाने सां.बा.खात्याची दरसुची सन २०२०-२१ नुसार या प्रस्तावास तरतुद उपलब्ध करून दिली आहे. या रस्त्यांचे पुर्नःडांबरीकरण करण्याचे अंदाजपत्रक र.रु.३१.८२ लक्ष चा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १९२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्राणी संग्रहालयात येणाऱ्या जडवाहनांमुळे अंतर्गत रस्त्यांवर बऱ्याच ठिकाणी खड्डे पडले आहेत. तेव्हापासून आजमितीपर्यंत या डांबरी रस्त्यांची देखभाल दुरुस्ती अथवा पुनःडांबरीकरण झालेले नाही. सेंट्रल झु ॲथॉरिटी, दिल्ली यांच्या कमिटीने या ठिकाणी पाहणी करून या रस्त्यांचे मजबुतीकरण करणेसाठी सां.बा.खात्याची दरसुची सन २०२०-२१ नुसार या प्रस्तावास तरतुद उपलब्ध करून दिली आहे. या रस्त्यांचे पुर्नःडांबरीकरण करण्याचे र.रु.३१.८२ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२५.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गुंठेवारी विकास अधिनियम सुधारणा होऊन महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-२०२१ हा अधिनियम लागू करण्यात आलेला असून या अधियिमानुसार दि.३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी गुंठेवारी कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून सदरचे काम सुरु करण्यात आलेले आहे. सदरचे काम जलदगतीने होण्यासाठी अनुभवी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर कर्मचाऱ्यांना अतिरीक्त कार्यभार सोपवून काम करून घेण्यात येत आहे. त्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांवर अतिरीक्त ताण निर्माण होत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कमल ५३(१) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

करीता, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-२०२१ हा अधिनियमानुसार दि.३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी या विवक्षित कामासाठी तांत्रिक कर्मचारी म्हणुन श्री.इखलास सिद्दीकी, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या

कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १९३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुंठेवारी विकास अधिनियम सुधारणा होऊन महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-२०२१ हा अधिनियम लागू करण्यात आलेला असून या अधियिमानुसार दि.३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी गुंठेवारी कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून सदरचे काम सुरु करण्यात आलेले आहे. सदरचे काम जलदगतीने होण्यासाठी अनुभवी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर कर्मचाऱ्यांना अतिरीक्कत कार्यभार सोपवून काम करून घेण्यात येत आहे. त्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांवर अतिरीक्त ताण निर्माण होत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कमल ५३(१) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

करीता, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-२०२१ हा अधिनियमानुसार दि.३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी या विवक्षित कामासाठी तांत्रिक कर्मचारी म्हणुन श्री.इखलास सिद्दीकी, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२५.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.बाळासाहेब पांडुरंगराव शिरसाट, कनिष्ठ अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका औरंगाबाद हे दि.१६.१०.२०२० ते दि.२९.१०.२०२० या कालावधीमध्ये कृपामाई हॉस्पीटल, औरंगाबाद येथे Infected Puedo Pancreate eryst with Septicemia या आजारा करीता उपचार घेतलेले आहे.

सदरील उपचारापोटी एकूण र.रु.२,५३,८७२/- इतका खर्च झालेला आहे. सदरील खर्चापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.६३,९१७/- इतकी आहे. शिल्लक र.रु.१,९०,६७५/- यापैकी देयक रक्कम ९० टक्के रु.१,९०,६७५/- यामधून ५ टक्के मनपा फंडात रु.१२,६९३/- निव्वळ देयक र.रु.१,५८,९१४/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने कृपामाई हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, नवीन इमारत मंत्रालय, मुंबई-३२ दि.१६.११.२०११ नुसार परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी

खाजगी रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरचा प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.बाळासाहेब पांडुरंगराव शिरसाट, कनिष्ठ अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.१,५८,९१४/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १९४/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.बाळासाहेब पांडुरंगराव शिरसाट, कनिष्ठ अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी कृपामाई हॉस्पीटल, औरंगाबाद येथे Infected Puedo Pancreate eryst with Septicemia या आजारा करीता उपचार घेतलेले आहे. नियमाप्रमाणे एकुण र.रु.१,५८,९१४/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १९५/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२६.०८.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.संजय प्रकाश लाहोट, वाहन चालक, वॉर्ड क्र.१, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या CAD Triple Vessel Disease With Sucessted TCA with Stenting of Vessels (ह्रदय आजार) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, शहानूर मियाँ दर्गा जवळ, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.३,४२,२९९/- (रुपये तीन लक्ष बेचाळीस हजार दोनशे नव्यान्नव) खर्च केलेला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांचे पुर्तता केलेली असून त्यांना ह्रदयाचे आजार CAD Triple Vessel Disease With Sucessted TCA with Stenting of Vessels उपचारार्थ एकूण केलेला खर्च र.रु.३,४२,२९९/- (रुपये तीन लक्ष बेचाळीस हजार दोनशे नव्यान्नव) इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.२५३२/- वजा जाता र.रु.३,३९,७६७/- शिल्लक रक्कमेचा ९०% रु.३,०५,७९०/- इतकी होते. एकूण खर्चाचा ५% (-) वजा जाता र.रु.१७,११४/- ही मनपा फंडात जमा करुन मंजुर देय र.रु.२,८८,६७६/- मधुन अग्रिम र.रु.१,५०,०००/- उर्वरित र.रु.१,३८,६७६/- संबंधीतास अदा करावयाचे आहे.

संबंधीताने उपचार युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, शहानूर मियाँ दर्गा जवळ, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.२०११/प्र.क्र./३३३/११/राकावि-२/मंत्रालय, मुंबई-३२ दि.१६.११.२०११ अन्वये व शासन परिपत्रक क्र.वैखप्र-२०१३/प्र.क्र.२९१/१३/राकावि-२ दि.११.१०.२०१३ मधील रुग्णालयाच्या यादीत जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. सदरचा प्रस्तावास पडताळणी करुन प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.संजय प्रकाश लाहोट, वाहन चालक, वॉर्ड क्र.१ यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.२,८८,६७६/- मधून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा करून उर्वरित र.रु. १,३८,६७६/- ही रक्कम संबंधतींना अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता, प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक १९५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संजय प्रकाश लाहोट, वाहन चालक, वॉर्ड क्र.१, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या CAD Triple Vessel Disease With Sucessted TCA with Stenting of Vessels (ह्रदय आजार) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, शहानूर मियाँ दर्गा जवळ, औरंगाबाद येथे उपचार झालेला आहे. नियमाप्रमाणे एकूण र.रु.२,८८,६७६/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा करून उर्वरित र.रु.१,३८,६७६/- ही रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०२.०९.२०२१)**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान येथील ३१ एकर क्षेत्रातील मुख्य रस्त्यास लागून असलेल्या ७००० चौ.मी. क्षेत्रात महानगरपालिका हिस्सा दुमजली वाहनतळ ५७०८ चौ.मी. अद्यावत मुख्य प्रवेशद्वार व सुरक्षारक्षक दालन ६० चौ.मी. आणि विकासक हिस्स्यात २३७३ चौ.मी. क्षेत्रात उद्यान संबंधीत (Gardern Related Shops) व अद्यावत उपहारगृह तसेच ९३५ चौ.मी.क्षेत्रात मनोरंजनासाठी अद्यावत खेळणी बसविणे इ.सर्व कामे विकासक मे. अर्थव ॲण्ड सुनील डेव्हलपर्स यांचेमार्फत बी.ओ.टी.तत्वावर प्रगतीपथावर आहे. लवकरच सदर प्रकल्पाची उपरोक्त सर्व कामे पुर्ण होणार आहे.

सदर प्रकल्पाअंतर्गत नव्याने आकर्षक मुख्य प्रवेशद्वाराचा समावेश असल्यामुळे सदर प्रवेशद्वाराचे काम प्रगतीपथावर असून ते पुर्ण होण्यापुर्वी अस्तित्वातील जुने प्रवेशद्वार निष्कासित करणे आवश्यक आहे. त्या करीता सदर जुने प्रवेशद्वार निष्कासित करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १९६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथील बी.ओ.टी. प्रकल्पाअंतर्गत येत असलेले जुने अस्तित्वातील मुख्य प्रवेशद्वार निष्कासित करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०७.०९.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत क्रांतीचौक पंपगृह येथे १८० अ.श. क्षमतेचे दोन विद्युत पंप कार्यरत असून सदरील पंप सन-१९७६ मध्ये बसविण्यात आलेले आहेत. आतापर्यंत जवळपास ४० वर्षे मोटर/पंपाने सर्व्हिस दिली आहे. पंप/मोटर जुने झाले असून त्यामध्ये वारंवार बिघाड होतो.

तसेच Pump Effiency/Discharge कमी झाल्यामुळे पाणी पुरवठ्यामध्ये व्यत्यय निर्माण होत आहे. करीता, सद्यस्थितीत कार्यरत मोटर/पंप बदलुन नवीन १५० अ.श. क्षमतेचे एकुण ०२ विद्युत पंप व मोटर बसविणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत या ठिकाणी १८० अ.श.क्षमतेचे दोन पंप कार्यरत आहेत. त्याऐवजी पंपाचा डिस्चार्ज न बदलता नवीन १५० अ.श.क्षमता पंप बसविल्यामुळे ३० अ.श.क्षमता कमी होऊन वीज देयकामध्ये दरमहा महानगरपालिकेची बचत होईल. औरंगाबाद शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन वाढीव पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यासाठी काम सुरु करण्यात आलेले आहे. सदरील योजना पुर्ण होऊन कार्यान्वीत होण्यासाठी सर्वसाधारणपणे ४ ते ५ वर्षाचा कालावधी लागु शकतो असे इकडील मत आहे. तो पर्यंत शहराचा पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता, सद्यस्थितीत शहरातील पाणी पुरवठा योजना सुस्थितीत कार्यान्वीत ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी उक्त नमुद पंप

बसविणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत सद्यस्थितीत कार्यरत असलेले जुने पंप वारंवार खराब झाल्यानंतर पाणी पुरवठा करण्यास व्यत्यय निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सद्यस्थितीत कार्यरत मोटर/पंप बदलुन नवीन १५० अ.श.क्षमतेचे एकुण ०२ विद्युत पंप व मोटार बसविणे योग्य होईल.

उपरोक्त प्रमाणे नवीन पंप खरेदी करुन बसविण्यासाठी करण्यासाठी अंदाजपत्रकाप्रमाणे र.रु.३७,८६,४२८/- चा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. मान्यता मिळाल्यास ई-टेंडरद्वारे जाहीर निविदा मागवुन सदरील पंप खरेदी करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १९७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत क्रांतीचौक पंपगृह येथे १५० अ.श.क्षमतेचे एकुण ०२ विद्युत पंप खरेदी करण्यासाठी रु.३७,८६,४२८/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. प्रस्तावित साहित्य खरेदी करण्यासाठी वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.०९.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत १०० दलली जलशुध्दीकरण केंद्र सन-१९९२ साली कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. केंद्राची उभारणी करतांना गाळणी हौद स्वच्छ करण्यासाठी उंचावरील टाकीमधून पाणी घेण्यासाठी ६०० मीमी व्यासाची व २५० मीमी व्यासाची दाबयुक्त हवा घेण्यासाठी एम.एस.जलवाहीनी टाकण्यात आलेली आहे. या पाईपांचे आयुर्मान २८ वर्षे झालेले असून क्लोरीनयुक्त पाण्यामुळे पाईप कमकुवत झालेले आहेत. सद्यस्थितीत गाळणी हौद क्र.१०,१२,६ व ४ यांच्या पाईपला गळती होऊन पाणी वाया जात आहे. यापुर्वी या पाईपची २ ते ३ वेळेस दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तथापि, पाईप जाडी अत्यंत कमी झालेली असल्याने वेल्डिंगद्वारे गळतीची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे या पाईपच्या दुरुस्ती करीता खंडणकाळ घेऊन संपुर्ण गाळणी हौद रिकामे करावे लागतात. शहर पाणी पुरवठा सद्यस्थिती लक्षात घेता, सदरील काम करणे सद्यस्थितीत शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे भविष्यात मोठ्या प्रमाणावर पाईपला भगदाड पडल्यास गाळणीगृहात पाणी साचून विद्युत मोटारींना हानी पोहचू शकते. करीता दोन्हीही जलवाहिन्या बदलणे अत्यंत गरजेचे आहे.

कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२०२० च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकीय र.रु.४२,१७,२६८/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. सदरील अंदाजपत्रकास व निविदा कार्यवाही करण्या करीता मा.प्रशासक यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता, निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे.

संदर्भ:-टेंडर आय.डी.क्र.2020-AMCA-583760-11

| अ.क्र. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
|---|---|---|
| १. | कामाचे स्वरुप/कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत १०० दलली जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे ६०० मीमी व २५० मीमी व्यासाचे एम.एस.पाईप बदलणे. |
| २. | पुर्वगणकपत्रक मान्य झालेले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा | होय, रु.४२,१७,२६८/- |

| | | |
|---|---|---|
| | ठराव | |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स/निविदा मागविण्यात आली? | रु.३७,६५,४१८/- |
| ३. | ज्या वृत्तपत्रात निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | ई निविदा मार्फत |
| ४. | अ) निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत | ०३.०२.२०२१ |
| ५. | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | ०५.०२.२०२१ |
| | निविदा किती वेळेस मागविल्या | सात वेळेस |
| ६. | एकुण किती निविदा आल्या? | एक |
| ७. | निविदा प्राप्त दर | अं.प.दरापेक्षा २०.४५% जास्त दराने |

त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १. | नुर कन्स्ट्रक्शन औरंगाबाद | ४५,३५,४४५/- | २०.४५% जास्त |

मा.प्रशासक महोदय यांनी केलेल्या वाटाघाटी अंती गुत्तेदार नुर कन्स्ट्रक्शन यांनी दाखल दरामध्ये २% दर कमी करुन अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १८.४५% जास्त दराने काम करण्यास सहमती दिलेली आहे. वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार निविदेची किंमत र.रु.४४,६०,१३८/- इतकी येते.

| | | |
|---|---|---|
| ८. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावांशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत | होय, खुल्या बाजारात लोखंडी पाईप, पोलादी पाईप इ.चे दर वाढलेले आहेत. |
| ९. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावेत. | जायकवाडी देखभाल दुरुस्ती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| १० | सदरचे काम डिपॉझिटमधून करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? डिपॉझिट रजिस्टर पान कमांक द्यावा) | लागू नाही |
| ११ | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकीत काम नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून मान्यतेनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.४५% जास्त दराने र.रु.४४,६०,१३८/- करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १९८/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना १०० दलली जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे ६०० मीमी व २५० मीमी व्यासाचे एम.एस.पाईप

बदलणे. या कामासाठी नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १८.४५% जास्त दराची व र.र.४४,६०,१३८/- खर्चाची निविदा मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १९९/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.०९.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.११८/नवि-२०, दि.२८.१०.२०१५ मध्ये नमुद मार्गदर्शक सुचना व प्रयोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिव्यांगांसाठीचा निधी शासन निर्णयातील प्रयोजनावर खर्च होण्याच्या अनुषंगाने **सन २०२१-२२** वर्षाकरीता अंदाजपत्रकात **'क-१९ दिव्यांग विकास व उत्थान कार्यक्रम'** या लेखाशिर्षा अंतर्गत रु.१७.०० कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे. यामध्ये खालीलप्रमाणे अंमलबजावणी करीता विभागनिहाय तरतुदींची विभागणी करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **योजना/प्रयोजन** | **र.रु.कोटी मध्ये** | **अंमलबजावणी करीता विभाग** |
|---|---|---|---|
| १. | अपंगांच्या शालेय शिक्षण/उच्चशिक्षण/खेळांडुकरीता शिष्यवृत्ती देण्यात यावी. | ०१.०० | शिक्षण विभाग |
| २. | उत्पन्नाच्या अटीवर घरकुलांसाठी अर्थसहाय्य देणे. | ०१.२५ | घरकुल कक्ष |
| ३. | अपंगांच्या मागणीनुसार त्यांना उदरनिर्वाह/व्यवसाय/साहित्य खरेदी करण्या करीता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावा. | ०१.०० | भांडार विभाग |
| ४. | अपंगांना वैद्यकीय खर्चाकरीता निधी उपलब्ध करावा. | ०१.२५ | आरोग्य विभाग |
| ५. | नागरी वाहतूक व्यवस्थेमध्ये अपंगांकरीता प्रवासात सवलत देणे व याकरीता होणाऱ्या तोट्याची भरपाई करणे. | ०१.०० | स्मार्ट सिटी विभाग |
| ६. | शॉपींग मॉल, मंड्या इत्यादींमध्ये अपंगांना स्टॉल उभारण्या करीता अर्थ सहाय्य करणे. | ०१.५० | मालमत्ता विभाग |
| ७. | महत्वाच्या स्थानिक बसस्टॉप/डेपोमध्ये व्हिलचेअर उपलब्ध करणे. | ०१.०० | भांडार विभाग |
| ८. | सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तींकरीता ऑडीयो लायब्ररी निर्माण करणे. | ०१.०० | वाचनालय विभाग |
| ९. | मनपाच्या शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांकरीता सोयी सुविधा उपलब्ध करणे. | ००.२५ | शिक्षण विभाग |
| १०. | अपंगांच्या क्रिडा, चित्रकला, हस्तकला स्पर्धा आयोजीत करणे. | ००.७५ | क्रिडा विभाग |
| ११. | अपंगांकरीता व्यायाम शाळा उभारणे. | ०१.५० | क्रिडा विभाग |
| १२. | अपंगांच्या बचतगटांना अर्थसहाय्य करणे. | ०१.२५ | महिला व बाल कल्याण विभाग |
| १३. | अपंगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे. | ०१.०० | सांस्कृतिक विभाग |
| १४. | अपंगांकरीता वेगळे भुवन/रात्रनिवारा उभारणे. | ०१.२५ | एनयुएलएम विभाग |
| १५. | अपंगांना पेन्शन योजना सुरु करणे. | ००.५० | लेखा विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | अपंग बेरोजगारांना भत्ता देणे. | ००.५० | एनयुएलएम विभाग |
| १७. | अपंगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रचार/प्रसार करणे. | ००.५० | जनसंपर्क विभाग |
| १८. | उपरोक्त व्यतिरीक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महत्वाकांक्षी योजना अंमलात आणणे. | ००.५० | लेखा विभाग |
| | **एकुण रक्कम रुपये** | **१७.०० कोटी** | |

उपरोक्त तरतुदीनुसार व शासन निर्णयानुसार **'क-१९ दिव्यांग विकास व उत्थान कार्यक्रम'** या लेखाशिर्षाअंतर्गत रु.१७.०० कोटी इतक्या खर्चास उक्त विभाग निहाय अंमलबजावणी करणे तसेच प्रसंगानुरुप प्रयोजनांतर्गत तरतुदीतील बदलासह मंजुरी प्राप्त होण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १९९/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.११८/नवि-२०, दि.२८.१०.२०१५ मध्ये नमुद मार्गदर्शक सुचना व प्रयोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिव्यांगांसाठीचा निधी शासन निर्णयातील प्रयोजनावर खर्च होण्याच्या अनुषंगाने **सन २०२१-२२** वर्षाकरीता अंदाजपत्रकात **'क-१९ दिव्यांग विकास व उत्थान कार्यक्रम'** या लेखाशिर्षाअंतर्गत रु.१७.०० कोटींची तरतुद करण्यात आली आहे. यामध्ये खालील प्रमाणे अ.क्र.१ ते १८ योजना/प्रयोजनाकरीता तरतुदींची विभागणी करण्यात आली असून सदरील तरतुदी व शासन निर्णयानुसार **'क-१९ दिव्यांग विकास व उत्थान कार्यक्रम'** या लेखाशिर्षाअंतर्गत रु.१७.०० कोटी इतक्या खर्चास तसेच प्रसंगानुरुप प्रयोजनांतर्गत तरतुदीतील करावयाच्या बदलासह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | योजना/प्रयोजन | र.रु. कोटी मध्ये | अंमलबजावणी करीता विभाग |
|---|---|---|---|
| १. | अपंगांच्या शालेय शिक्षण/उच्चशिक्षण/खेळांडुकरीता शिष्यवृत्ती देण्यात यावी. | ०१.०० | शिक्षण विभाग |
| २. | उत्पन्नाच्या अटीवर घरकुलांसाठी अर्थसहाय्य देणे. | ०१.२५ | घरकुल कक्ष |
| ३. | अपंगांच्या मागणीनुसार त्यांना उदरनिर्वाह/व्यवसाय/ साहित्य खरेदी करण्या करीता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावा. | ०१.०० | भांडार विभाग |
| ४. | अपंगांना वैद्यकीय खर्चाकरीता निधी उपलब्ध करावा. | ०१.२५ | आरोग्य विभाग |
| ५. | नागरी वाहतूक व्यवस्थेमध्ये अपंगांकरीता प्रवासात सवलत देणे व याकरीता होणाऱ्या तोट्याची भरपाई करणे. | ०१.०० | स्मार्ट सिटी विभाग |
| ६. | शॉपींग मॉल, मंड्या इत्यादींमध्ये अपंगांना स्टॉल उभारण्या करीता अर्थ सहाय्य करणे. | ०१.५० | मालमत्ता विभाग |
| ७. | महत्वाच्या स्थानिक बसस्टॉप/डेपोमध्ये व्हिलचेअर उपलब्ध करणे. | ०१.०० | भांडार विभाग |
| ८. | सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तींकरीता ऑडीयो | ०१.०० | वाचनालय विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | लायब्ररी निर्माण करणे. | | |
| ९. | मनपाच्या शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांकरीता सोयी सुविधा उपलब्ध करणे. | ००.२५ | शिक्षण विभाग |
| १०. | अपंगांच्या क्रिडा, चित्रकला, हस्तकला स्पर्धा आयोजीत करणे. | ००.७५ | क्रिडा विभाग |
| ११. | अपंगांकरीता व्यायाम शाळा उभारणे. | ०१.५० | क्रिडा विभाग |
| १२. | अपंगांच्या बचतगटांना अर्थसहाय्य करणे. | ०१.२५ | महिला व बाल कल्याण विभाग |
| १३. | अपंगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे. | ०१.०० | सांस्कृतिक विभाग |
| १४. | अपंगांकरीता वेगळे भुवन/रात्रनिवारा उभारणे. | ०१.२५ | एनयुएलएम विभाग |
| १५. | अपंगांना पेन्शन योजना सुरु करणे. | ००.५० | लेखा विभाग |
| १६. | अपंग बेरोजगारांना भत्ता देणे. | ००.५० | एनयुएलएम विभाग |
| १७. | अपंगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रचार/प्रसार करणे. | ००.५० | जनसंपर्क विभाग |
| १८. | उपरोक्त व्यतिरीक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महत्वाकांक्षी योजना अंमलात आणणे. | ००.५० | लेखा विभाग |
| | **एकुण रक्कम रुपये** | **१७.०० कोटी** | |

उपरोक्त प्रमाणे दिव्यांगांसाठीच्या योजना/प्रयोजनांची अंमलबजावणी योजने समोर दर्शविलेल्या विभागाने दिव्यांग विभागामार्फत प्राप्त झालेल्या अर्जांवर आवश्यक तो लाभ देण्यासाठीची वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक २००/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.०९.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद मनपा हद्दीत मोकाट श्वान निर्बजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षासाठी AWBI मान्यता प्राप्त संस्थेमार्फत ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठी तिसऱ्या वेळेस ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. सर्वात कमी दराची निविदा निविदाधारकासोबत वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर निश्चीत करण्यात आलेले आहेत.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **मे.अरिहंत वेलफेअर सो.यांचे वाटाघाटी नंतर निश्चीत केलेले दर** |
|---|---|---|
| १. | शहरातील मोकाट श्वान तक्रारींच्या ठिकाणाहून स्वत:च्या कर्मचाऱ्यांमार्फत स्वत:च्या वाहनातून पकडून आणणे, श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे पश्चात सुश्रुषा आणि त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे. | रु.९००/- |
| २. | शहरातील मोकाट श्वान तक्रारींच्या ठिकाणाहून मनपाच्या वाहनातून मनपा पथकामार्फत पकडण्यात आलेल्या श्वानाचे शस्त्रक्रिया पश्चात सुश्रुषा आणि त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे. | रु.७००/- |
| ३. | तक्रारीच्या ठिकाणाहून धोकादायक पिसाळलेले व उपचार अंती | र.६५/- |

| | | |
|---|---|---|
| | दुरुस्त न होऊ शकणारे श्वान (सीआरसीयु) च्या नियंत्रणा खाली दयामरण देणे. | |
| ४. | आजारी श्वान, पिल्ले तक्रारीच्या ठिकाणाहून पकडून आणणे उपचार देखभाल करून त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे. | रु.७०/- |

तुलनात्मक दृष्ट्या वरील निविदाधारकामध्ये सर्वात कमी दर हे मे.अरिहंत वेलफेअर सोसायटी, शिवाजी नगर, भुम जि.उस्मानाबाद यांची असून एजन्सी धारकासोबत वाटाघाटी मध्ये खालीलप्रमाणे दर कमी करून निश्चीत करण्यात आले आहेत.

वरील प्रमाणे वाटाघाटी नंतर दर कमी करण्यात आलेले आहेत. या कमी दरानुसार सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षासाठी मंजुर होऊन सन २०२१ ते २०२२ या एका वर्षासाठी ७००० (सात हजार) श्वानाचे उद्दिष्ट ठेऊन त्या करीता अंदाजे रु.५० लक्ष एवढा खर्च होणार आहे.

करीता, प्रस्ताव मान्यतेसाठी विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक २००/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मनपा हद्दी मोकाट श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षासाठी राबविण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदेपैकी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.अरिहंत वेलफेअर सोसायटी, शिवाजीनगर, भुम, जि.उस्मानाबाद यांच्याशी झालेल्या वाटाघाटी अंती दर निश्चीत झाल्यानुसार श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम वरील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या दरास व सन २०२१-२०२२ या एका वर्षासाठी ७००० (सात हजार) श्वानांचे उद्दीष्ट ठेऊन त्या करीता अंदाजे रु.५० लक्ष खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक २०१/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.०९.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र.१०६४ दि.१३/०६/२०१९ नुसार शहरातील विविध रस्त्यांची कामे करणे करीता प्रकल्प अहवाल तयार करणे व या आधारे शासन निधीची मागणी करणे साठी महानगरपालिकेने निविदा प्रक्रियेअंती यश इन्नोव्हेटीव्ह एल.एल.पी., औरंगाबाद यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) म्हणून नियुक्ती केली असून त्यांचे मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून सर्व आवश्यक प्रक्रियेअंती राज्य शासनाने अंतिम केल्यानुसार एकूण २३ रस्त्यांची रक्कम रु.१५२.५८ कोटीची कामे विविध कार्यान्वयन यंत्रणेमार्फत प्रगतीपथावर आहेत. या रस्त्यांच्या कामा व्यतिरिक्त उक्त नमूद ठरावामधील उर्वरित काही रस्ते व शहराच्या विविध भागातील इतर बहुतांश रस्त्यांची सद्यस्थिती रहदारीस योग्य नाही. यामुळे या रस्त्यांचा विकास करणे व अस्तित्वातील पुलांचे बांधकाम करणे आवश्यक झाले आहे. सदर रस्त्यांचा खालील प्रमाणे प्रस्तावात समावेश करण्यात आलेला असून यामध्ये विविध विकास योजना रस्ते (DP Road), मंजुर रेखांकनातील मुख्य रस्ते, सिडको भागातील रस्ते, एम.आय.डी.सी चिकलठाणा भागातील रस्ते व इतर आवश्यक रस्त्यांचे कॉंक्रीट करण्याच्या कामांचा
पुलांसह समावेश करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| १ | महात्मा गांधी पुतळा शाहगंज ते सिटी चौक ते मुख्य पोस्ट ऑफिस पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५.०६ |
| २ | महात्मा गांधी पुतळा शाहगंज ते किराणाचावडी ते अभिनय टॉकिज़ पर्यंत | ४.७४ |

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| | व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | |
| ३ | लक्ष्मणचावडी ते कैलासनगर स्मशानभुमी पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५.७५ |
| ४ | प्रतापनगर स्मशानभुमी ते संग्रामनगर उड्डाणपुला पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे आणि प्रतापनगर स्मशानभुमी जवळील दोन पुलांचे बांधकाम व देवानगरी येथील अंतर्गत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ४.९६ |
| ५ | बीड बायपास येथील संभाजीनगर कमान ते छत्रपतीनगर दत्त मंदिर पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | १.६८ |
| ६ | हरसिध्दी माता मंदिर हर्सुल ते नविन वसाहत पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ३.९४ |
| ७ | आनंद गाडे चौक एकनाथनगर ते रेल्वेगेट पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | २.१२ |
| ८ | पडेगाव कतलखाना ते साई मैदान कम्पाऊंड (भिमनगर भावसिंगपुरा वार्ड क्र.१६ व १३) पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ६.९६ |
| ९ | जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन गारखेडा ते रोपळेकर हॉस्पिटल सावरकर चौक पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ८.६५ |
| १० | आकाशवाणी चौक ते गजानन महाराज मंदिर चौक मार्गे त्रिमुर्ती चौक पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ७.२२ |
| ११ | हेगडेवार हॉस्पिटल ते चेतक घोडा चौक पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ३.१० |
| १२ | आई हॉस्पिटल जळगाव रोड ते देवगिरी बँक मयुरपार्क पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | २.७० |
| १३ | विवेकानंद चौक विश्वभारती कॉलनी ते अग्नीहोत्री चौक मार्गे रिध्दी सिध्दी हॉल पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ३.६३ |
| १४ | दादुजी कोंडदेव स्कुल ते मारुती मंदिर पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे, व फुटपाथ बांधणे. | १.१६ |
| १५ | सराफा ते पानदरीबा / बोहरी कठडा पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ०.३६ |
| १६ | कॅन्सर हॉस्पिटल व्हि.आय.पी. रोड जंकशन ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे व परिसरातील रस्ते व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | ०.९८ |
| १७ | छत्रपती महाविद्यालय एन-३ सिडको ते मा.उच्च न्यायलय पर्यंत व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे मार्गे ॲड. प्रवीन मंडलिक यांचे निवास स्थान. | ०.६० |
| १८ | सिडको एन-६ येथील शिवज्योती हौसिंग सोसायटी मधील अंतर्गत रस्ते व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | १.६६ |
| १९ | बुन स्कुल जटवाडा रोड समोरील फरहतनगर मंजुर रेखांकनातील विकास योजना रस्ता व अंतर्गत रस्ते व्हाईट टॉपिंग व्दारे कॉंक्रीट रस्ते | १.७२ |

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| | तयार करणे. | |
| २० | रेल्वे गेट ते तरूणभारत व एम.आय.टी. कॉलेज बीड बायपास पर्यंतच्या रस्त्याचे पुलाच्या बांधकामासह व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५.०१ |
| २१ | पैठणरोड मातोश्री वृध्दाश्रम ते एम.बी.आर. नक्षत्रवाडी पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे | २.८७ |
| २२ | गोपाल टी ते पीर बाजार मार्गे गुरूदवारा पर्यंत व्हाईट टॉपिंग द्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ३.४६ |
| २३ | गट नं.१७९/५ अंबिकानगर ते गट नं.१८८ छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत फुटपाथसह व्हाईट टॉपिंग द्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | २.०० |
| २४ | हर्सुल गाव ते जमनज्योती महापालिका हद्दीपर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग द्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ३.०६ |
| २५ | बन्सीलालनगर येथील हॉटेल तंदूर लोलगे पेट्रोल पंप ते नुतन स्कुल ते श्री.जोनी व केळकर यांच्या घरापर्यंतच्या रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.८० |
| २६ | जयदुर्गा हौसिंग सोसायटी ते शिवाजीनगर पाण्याची टाकी पर्यंतच्या विकास योजना रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.६५ |
| २७ | जानकी हॉटेल विद्यानगर ते श्रध्दा हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.६२ |
| २८ | कांचनवाडी ते नाथपुरम चौक व नाथ व्हॅली रस्ता ते रॉकवुड सोसायटी पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | ०.६४ |
| २९ | हॉटेल पुषकर एन-९ सिडको ते महानगरपालिका शाळेपर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.५२ |
| ३० | महात्मा गांधी पुतळा शाहगंज ते छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्राहलय पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.२९ |
| ३१ | मोंढा हौद ते हरी मस्जिद पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.०४ |
| ३२ | एम्स हॉस्पिटल एन-११ ते हर्सुल टी-पाईंट स्मशानभुमी पर्यंतचा सर्व्हिस रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.८९ |
| ३३ | हॉटेल शरद एन-९ पवनगनर ते शिव जागृती मंदिर एन-९ एम-२ पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.५७ |
| ३४ | हनुमान मंदिर पडेगाव ते कतलखाना पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ९.८४ |
| ३५ | संजिवनी रेसिडेन्सी ते इब्राहिम कॉलनी बेगमपुरा पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.११ |
| ३६ | शंभुनगर त्रिशरण चौक ते गादिया विहार पर्यंतचा रस्ता पुलाच्या बांधकामासह व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.६८ |
| ३७ | हॉटेल शरद ते गौरव प्रोव्हिजन साई मैदान ते शिव हॉटेल (एन-११ सुदर्शन नगर) पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.९८ |

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| ३८ | शिव जागृती मंदिर एन-९, एम-२ ते ट्राफिक गार्डन सिडको एन-९ पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ०.७९ |
| ३९ | हर्सुल येथील सारंगधर चव्हाण किराणा ते खत्रीनगर कृष्णापुरवाडी पर्यंतचा रस्ता व कांचनवाडी येथील वुडरिज शाळे जवळील डी.पी. रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | ५.१४ |
| ४० | शितला माता मंदिर टिळकपथ ते आर्य समाज मंदिर औरंगपुरा पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.३५ |
| ४१ | वानखेडेनगर मधील श्री.अब्दुल सत्तार यांच्या घरापासून ते जटवाडा रोड येथील गट नं.१६, १७, १३९, १४१ व ११० पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | २.८१ |
| ४२ | वार्ड क्र.६ यादवनगर ते एन-११ महानगरपालिका आरोग्य केंद्र मार्गे राष्ट्रवादी भवन पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ०.८३ |
| ४३ | आंबेडकर पुतळा, भगतसिंगनगर ते पिसादेवी पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | ६.१९ |
| ४४ | अविष्कार चौक एन-६ सिडको ते भोला पान सेंटर सिडको पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.३८ |
| ४५ | एम.आय.टी. चौक ते सि.ए. असोसिऐशन पर्यंतचा रस्ता पुलाच्या बांधकामासह व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.१८ |
| ४६ | नेहरु भवन ते औरंगपुरा मार्गे देना बॅंक पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.०७ |
| ४७ | हर्सुल टी-पाईंट ते कलावती लॉन्स (जाधववाडी सर्व्हिस रोड) पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | ९.२२ |
| ४८ | एस.बी.ओ. स्कुल जळगाव रोड ते भगतसिंगनगर मार्गे अंबिकानगर तुळजाभवानी चौक पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | ५.०८ |
| ४९ | बीड बायपास येथील व्दारकापुरी मंजूर रेखांकन, अर्थ कलासिक, रॉयल क्लासिक येथील रस्त्याचे कॉंक्रीट करणे | ३.४६ |
| ५० | हर्सुल येथील सर्वे नं.१५३ बारव विहीर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक वडाच्या झाडापर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे आणि फुटपाथ व दुभाजक बांधणे. | १०.७० |
| ५१ | पेठेनगर येथील कमल सोसायटी ते निसर्ग कॉलनी पर्यंतचा रस्तो पुलासह कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | ०.७१ |
| ५२ | चिकलठाणा विमानतळा समोरील न्यु हायस्कुल ते पळसकर हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.०७ |
| ५३ | रेल्वेस्टेशन उड्डाणपुल सर्व्हिस रोड ते राहुलनगर स्मशानभुमी मार्गे बनेवाडी जुना पंप हाऊस पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.७६ |
| ५४ | एन-१ टाऊन सेंटर येथील सर्व्हिस इंडस्ट्रीयल एरिया येथील रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ४.२४ |

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| ५५ | कटकट गेट ते रविंद्रनगर व रौशन गेट ते पटेल टी हाऊस पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ४.४१ |
| ५६ | भाग्यनगर येथील जितुरकर हॉस्पिटल ते अदालत रोड पर्यंत व अंतर्गत रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ४.६७ |
| ५७ | माऊली मेडिकल ते भावसिंगपुरा सांची कमान पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.३४ |
| ५८ | एन-१ भागातील मुख्य प्रशासक सिडको यांचे निवास स्थान ते पी.एफ. कार्यालय पर्यंत व अंतर्गत रस्ते व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ४.२९ |
| ५९ | एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागातील धुत हॉस्पिटल ते उत्तरानगरी मुख्य रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.८५ |
| ६० | टाऊन हॉल ते मकई गेट पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.३२ |
| ६१ | सौभाग्य चौक ते ताठे मंगल कार्यालय ते सिध्दार्थ चौक (एन-११ भाजी मंडई) पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.१२ |
| ६२ | एम.टी.डी.सी. हॉलीडे कॅम्प ते अण्णाभाऊ साठे चौक मार्गे मिलींदनगर, कबीरनगर रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ४.१९ |
| ६३ | मुख्य बस स्थानकते खाम नदी वरील पुलापर्यंतच्या रस्त्याचे व सिध्दार्थ जलतरण तलाव ते गरमपाणी जंकशन पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे | २.४९ |
| ६४ | इंडो जर्मन टुल रूमच्या मागील बाजुस असलेल्या जळगाव जंकशन ते एन-१ कलाग्राम पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.२७ |
| ६५ | तापडीया पार्क ते एम.एस. पब्लिक स्कुल ते पुंडलिकनगर पोलीस स्टेशन आणि पारिजातनगर मनपा उद्यान समोरील रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.२५ |
| ६६ | सिडको एन-७ देवगिरी बँक, जळगाव रोड ते बजरंग चौक सिडको एन-५ पर्यंतच्या रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.१२ |
| ६७ | ओंकार गॅस एजन्सी एन-८ सिडको ते अनिकेत हॉस्पिटल मार्गे वेणुताई चव्हाण शाळा पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.१९ |
| ६८ | मुंबई हायवे पासून एम.जी.एम. गोल्फ कलब मार्गे सरोश स्कुल पडेगाव रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.७५ |
| ६९ | एस.बी.ओ.ए. शाळा ते मयुर पार्क मार्गे गुरूदत्त मंदिर रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.५५ |
| ७० | दशमेशनगर शिव मंदिर ते विश्वरुप हॉल पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.८५ |
| ७१ | दर्गा हज़रत पिर गैब साहब पुला पासून ते चंपा चौक मार्गे रेंगटीपुरा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ६.६० |
| ७२ | मंत्री मार्बल इन्डस्ट्रीज ते राज बिल्डकॉन ते स्कॉन प्रोजेक्ट्स ते पॅरासन कंपनी ते मनपा शाळा मसनतपुर रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.४३ |
| ७३ | हनुमाननगर येथील श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्या घराजवळील हनुमान | ०.२२ |

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| | मंदिर ते पुंडलिकनगर मुख्य रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | |
| ७४ | रिलायन्स पेट्रोल पंप, जळगाव रोड पासून ते एन-७ पोलीस स्टेशन मार्गे त्रिदेवता मंदिर पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.४२ |
| ७५ | एकता चौक शाहनुरमिया दर्गा ते प्रतापनगर ऑटो रिक्षा स्टॅण्ड (पंजाब डेअरी) पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.९४ |
| ७६ | साई मैदान एन-११ ते टि.व्हि. सेंटर रस्ता (जिजाऊ चौक) पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ०.८३ |
| ७७ | रामायण कल्चरल हॉल उल्कानगरी ते विभागीय क्रिडा संकुल व रिध्दी सिध्दी हॉल लगतच्या रस्त्याचे दोन पुलाच्या बांधकामासह रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ५.४१ |
| ७८ | मंझूरपुरा ते मनपा कार्यालय ते टाऊन हॉल ओव्हर ब्रिज सर्व्हिस रस्त्यापर्यंत रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ४.३५ |
| ७९ | अण्णाभाऊ साठे चौक ते शाहगंज चमन पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.१३ |
| ८० | बळवंत वाचणालय औरंपुरा ते बाराभाई ताजिया गुलमंडी पर्यंतरस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.५९ |
| ८१ | ड्रीमलॅण्ड लॉज ते मुलमची बाजार (मोहन टॉकिज़ मागील बाजु) ते घास मंडी पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.३३ |
| ८२ | पार्श्वनाथ चौक ते राजे संभाजी चौक मार्गे महाविर जैन मंदिर, सिडको एन-९ व बळीराम पाटील शाळेलगतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.२१ |
| ८३ | मनपा कार्यालय ते जामा मस्जिद कब्रस्तान पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.४३ |
| ८४ | पैठणगेट पार्किंग ते गायत्री चाट भांडार गुलमंडी पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.५३ |
| ८५ | गणपती मंदिर नागेश्वरवाडी ते महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालय व खनाळे हॉस्पिटल ते झांसी राणी चौक पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ०.७९ |
| ८६ | बाटा शुज़ ते एस.बी. शिक्षण संस्था गेट व गोली वडापाव ते एस.बी. शिक्षण संस्था पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ०.७६ |
| ८७ | एन-५ सिडको श्री.काकडे पाटील प्लॉट नं.३३४-ई यांच्या घरापासून ते एन-५ कम्युनिटी सेंटर पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.६० |
| ८८ | तोतला हॉस्पिटल ते मोतीवाला नगर पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.८० |
| ८९ | एन-१ सिडको सेक्टर-ए येथील विविध ठिकाणी रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.२७ |

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| ९० | एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागातील वोक्हार्ड रिसर्च सेंटर ते मिलेनियम पार्क पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ४.०६ |
| ९१ | जैन इंटरनॅशनल स्कुल संग्रामनगर उड्डाणपुल (शाहनुर मिया दर्गा रोड) ते शिवकृपा आय हॉस्पिटल ते ॲड.तांगडे यांच्या घरापर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.०१ |
| ९२ | एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागात मडिलगेकर आर्ट स्टुडियो समोरील रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.१८ |
| ९३ | कांचननगर ते हिंदुस्थान आवास पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | ४.५० |
| ९४ | वाल्मी संस्था पैठण रोड ते सैनिक विहार रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे | १.५४ |
| ९५ | हर्सुल येथील श्री.बन्सी मामा जाधव यांच्या घरापासून ते राधास्वामी कॉलनी ते नविन वसाहत पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे | २.७५ |
| ९६ | एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागातील पावरलुम जवळील लक्ष्मीअग्नी कंपनी ते साई चौक पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.३७ |
| ९७ | टि.बी. हॉस्पिटल आमखास मैदान ते आरेफ कॉलनी फोर्ट वॉल पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.६१ |
| ९८ | मुंबई हायवे पडेगाव ते योहान हौसिंग सोसायटी पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.७७ |
| ९९ | गारखेडा येथील कारगील मैदान समोरील रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.२७ |
| १०० | सातारा परिसर येथील खंडोबा मंदिराकडे जाणाया रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणे | १.०० |
| १०१ | एन-७ सिडको येथील डॉ.कल्याण काळे यांच्या घरापासून ते लोकसेवा स्टेशनरी ते परिवर्तन गॅरेज मथुरानगर एन-६ सिडको पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.२३ |
| १०२ | चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागातील मनपा गरवारे स्टेडियम समोरील आय.टी. पार्क ते गरवारे बाल कोव्हिड सेंटर व फलेमिंगो अपार्टमेंट पर्यंतचा पोच रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ३.०३ |
| १०३ | चुन्नीलाल पेट्रोल पंप अदालत रोड ते एस.एस.सी. बोर्ड पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.३६ |
| १०४ | सागर हॉटेल ते बिड बायपासच्या पुर्वेकडील सिल्कमिल कॉलनी येथील सर्व्हिस रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.१५ |
| १०५ | प्रतापनगर खुलेमंच ते व्दारकापुरी रो-हाऊस ले-आऊट रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | २.२९ |
| १०६ | नक्षत्रवाडी गट नं.२ व ५ येथील विकास योजना रस्ता व मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्ते व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.६० |

| अ.क्र. | रस्त्यांचे नांव | अंदाजीत रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| १०७ | जालननगर शिवगर्जना खुलेमंच ते हिदायत यांच्या घरापर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे.(रेल्वे ट्रॅक लगत) | १.५४ |
| १०८ | सातारा परिसरातील आलोकनगर भागात श्री.बनसोडे यांच्या घरापासून ते औरा व्हिलेज पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.०९ |
| १०९ | सातारा परिसरातील न्यु भाग्योदयनगर भागात उमरीकर लॉन ते लोटसपार्क पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | १.२३ |
| ११० | आर.बी. हिल्स, नाथ प्रांगण ते रेणुका ब्युटी पार्लर ते के बिल्डींग पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | ०.२५ |
| १११ | पैठण गेट ते निराला बाजार पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | २.१० |
| | एकुण | ३१७.२२ |

उक्त नमूद प्रमाणे एकुण १११ रस्त्यांची पुलांसह कामे हाती घेण्यासाठी महानगरपालिकेतर्फे यापुर्वी नियुक्त करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) यश इन्नोव्हेटीव्ह एल.एल.पी., औरंगाबाद यांच्या मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सन २०२१-२०२२ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची नुसार तयार करणे व या करीता निधी प्राप्त करून घेणेसाठी शासनाकडे सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

करीता, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे एकूण १११ रस्त्यांची कामे पुलाचे बांधकामासह हाती घेण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल रक्कम रु.३१७.२२ कोटी रक्कमेचा प्रस्ताव निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शहराच्या विविध भागातील बहुतांश रस्त्यांची सद्यस्थिती रहदारीस योग्य नसल्याने सदर रस्ते व्हॉईट टॉपिंग (कॉक्रीट) द्वारे विकसीत करण्याच्या दृष्टीने या रस्त्यांची कामे पुलाच्या बांधकामासह करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने यापुर्वी निविदा प्रक्रियेअंती यश इन्नोव्हेटीव्ह एल.एल.पी., औरंगाबाद यांची रस्त्यांच्या कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) म्हणून नियुक्ती केली असून त्यांचे मार्फत सदरील कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सन २०२१-२०२२ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुचीनुसार तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये एकूण १११ रस्त्यांचा पुलांसह समावेश असून एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.३१७.२२ कोटी आहे. सदर कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ही कामे करण्याइतपत चांगली नसल्यामुळे या कामांना शासन निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी मान्यता देण्यात येते. तसेच मंजूर होणाऱ्या शासन निधीच्या मर्यादेत बी-१ स्वरुपात निविदा कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक २०२/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०९.०९.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने रेल्वेस्टेशन उड्डाणपुलाखाली सौंदर्यीकरण केले असून त्या ठिकाणी प्रत्येकी दोन वाहनतळ दोन चाकी व चार चाकी व दोन फुड प्लाझा (हॉकर्स) उद्यान विभागाकडून अद्यावत करण्यात आलेले आहे. त्यासाठी निविदा पध्दतीने देणेसाठी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देऊन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यात प्रति वर्ष

र.रु.२,००,०००/- (दोन लक्ष रुपये मात्र) निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या असून अनुक्रमे (१) मे.शिवराज मल्टी सर्विसेस या संस्थेचे उच्च दर र.रु.२,००,५००/- (दोन लक्ष पाचशे रुपये मात्र), (२) श्री.शफीक यान यासीन शेख दर र .रु.२,००,२००/- (दोन लक्ष दोनशे रुपये मात्र), (३) श्री.संतोष राजु कांबळे दर र.रु.२,००,००२/- (दोन लक्ष दोन रुपये मात्र) प्राप्त झाले आहे. करीता सर्वोच्च दर धारक मे.शिवराज मल्टी सर्वीसेस या संस्थेस दर र.रु.२,००,५००/-(दोन लक्ष पाचशे मात्र) निविदा मान्य करण्यासाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तसेच विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक २०२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे.शिवराज मल्टी सर्व्हिसेस या संस्थेचे उच्च दर र.रु.२,००,५००/- (दोन लक्ष पाचशे रुपये मात्र) आहे. उक्त दरास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २०३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०९.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बाबा पेट्रोल पंप महावीर चौक येथील उड्डाणपुलाखाली दक्षिण बाजुस पद्मपुरा चौकाकडे जाणाऱ्या Bay मध्ये असलेल्या रिकाम्या जागेत Pay & Use शौचालय स्वखर्चाने बांधून ३० वर्षासाठी चालविण्यास मे.आधार फाऊंडेशन, मुंबई यांना लिज बेसीस वर पुढील ३० वर्ष स्वखर्चाने संचलन व व्यवस्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त नमुद जागेत मे.आधार फाऊंडेशन, मुंबई यांना ३० वर्षाच्या लिज बेसीसवर Pay & Use पध्दतीवर चालविण्या जाणाऱ्या शौचालयाचे स्वखर्चाने बांधकाम करण्यास व पुढील ३० वर्ष संचलन व व्यवस्थापन करण्यास देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक २०३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बाबा पेट्रोल पंप महावीर चौक येथील उड्डाणपुलाखाली दक्षिण बाजुस पद्मपुरा चौकाकडे जाणाऱ्या पंचवटी चौकाकडील Bay मध्ये असलेल्या रिकाम्या जागेत स्वखर्चाने Pay & Use शौचालय बांधणे व पुढील ३० वर्षाच्या लिज बेसीसवर पुढील ३० वर्ष शौचालयाचे व्यवस्थापन व संचलन करण्यास मे.आधार फाऊंडेशन, मुंबई यांना देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स्वाक्षरीत/-**
महापालिका सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

**स्वाक्षरीत/-**
प्रशासक
महानगरपालिका औरंगाबाद